## प्रकरण तिसरे

# पुणे जिल्हा व सहकारी चळवळ


३.१ प्रस्तावना

३.२ ऐतिहासिक पार्श्वभूमी

३.३ भौगोलिक स्थान

३.४ प्रशासकीय रचना

३.५ लोकसंख्या

३.६ मृदा, कृषी उत्पादने व पिके

३.७ नद्या व प्रकल्प

३.८ हवामान व प्रर्जन्यमान

३.९ जमिन क्षेत्र

३.१० नैसर्गिक साधन संपत्ती

३.१०.१ रस्ते

३.१०.२ शैक्षणिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक

३.१०.३ पर्यटन स्थळे

३.१०.४ धार्मिक स्थळे

३.११ स्थानिक स्वरांज्य संस्था

३.१२ औद्योगिक विकास

३.१३ पायाभूत सुविधा

३.१३.१ वीज

३.१३.२ उद्योग

४.१३.३ वाहतूक व दळणवळण

३.१४ सहकाराचा अर्थ व व्याख्या

३.१५ सहकाराची वैशिष्ट्ये

३.१६ सहकाराचे स्वरूप

३.१६.१ आर्थिक स्वरूप

३.१६.२ साामजिक स्वरूप

३.१६.३ शैक्षणिक स्वरूप

३.१६.४ वैचारिक स्वरूप

३.१६.५ संघटनात्मक स्वरूप

३.१७ सहकाराची व्याप्ती

३.१८ जागतिक सहकारी चळवळीचा उगम व उदय

३.१९ भारतातील सहकार चळवळ प्रारंभ व विकास

३.१९.१ स्वातंत्र्यपूर्व काळातील सहकारी चळवळ

३.१९.२ स्वातंत्र्योत्तर काळातील सहकारी चळवळ

३.२० महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचा इतिहास

३.२१ पुणे जिल्ह्यातील सहकारी चळवळीचा इतिहास व उगम

३.२२ सहकारी चळवळीमध्ये शासनाची भूमिका

३.२२.१ स्वातंत्र्यपूर्व काळातील शासनाची भूमिका

३.२२.२ स्वातंत्र्योत्तर काळातील शासनाची भूमिका

३.२३ सारांश

# प्रकरण तिसरे

# पुणे जिल्हा व सहकारी चळवळ

## ३.१ प्रस्तावना :

प्रस्तुत प्रकरण दोन भागात विभागले आहे. त्यातील पहिल्या भागात पुणे जिल्ह्या संबंधीची माहिति दिली आहे तर तर दुसऱ्या विभागात सहकारी चळवळीचा अभ्यास केला आहे.

**अ) पुणे जिल्हा :**

सदर विभागात पुणे जिल्ह्याची ओळख दिली आहे. पुणे हा पुरातन व ऐतिहासिक वारसा असणारा जिल्हा आहे. पुणे शहर महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी आहे. या शहराला छत्रपती शिवाजी महाराजांपासून मोठी ऐतिहासिक परंपरा आहे. पेशवाई आणि ब्रिटीशांच्या काळातही पुणे अनेक क्षेत्रात नावाजलेले होते. पूर्वीच्या काळी या शहराला कसबे पुणे, पुण्यपूर, पुण्यविषय, पुनवडी इत्यादी ओळखले जात होते. म्हणून पुणे जिल्ह्याचा इतिहास, भौगोलीक सिमा, क्षेत्रफळ, लोकसंख्या, साक्षरता, कर्ती लोकसंख्या, नैसर्गीक साधन संपत्ती, मृदा, खनिज संपत्ती, प्रशासकिय विभाग अशा विविध घटकांचा सविस्तर अभ्यास केला आहे.

## ३.२ पुणे जिल्ह्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी :

प्राचीन काळात पुणे जिल्हा हा यादव यांच्या साम्राज्याचा भाग होता. दुसऱ्या बाजीरावाने १८१८ मध्ये हा भाग इंग्रजाच्या स्वाधीन करण्याअगोदर १०० वर्ष पुणे हे मराठ्यांच्या राजधानीचे केंद्र होते.[१]

पुणे शहराच्या नावावरून जिल्ह्याला पुणे जिल्हा नाव दिले आहे. टॉलेमी (ख्रि.पू.१५०) यांच्या लेखनात पुणे शहराचा उल्लेख 'पुनाता' असा आढळतो. तर राष्ट्रकूट यांच्या ताम्रपटावरील कोरीव लेखांमध्ये या शहराचा उल्लेख 'पुनकवाडी', 'पुण्यविषय', 'पुनकविषय' असा आढळतो. पुण्य या शब्दावरून पुणे असे नाव पडले असावे, मोगल राजवटीत या गावाला 'कसबे पुणे' असा उल्लेख सापडतो. आंध, चालुक्य, राष्ट्रकुटांच्या राजवटी तसेच यादव, बहामणी, निजामशाही, आदिलशाही, राजवटी पुण्याने पाहिल्या.[२] हिंदवी स्वराज्याचे बीज येथेच रूजले. मराठा राजवटीचे केंद्र, पेशव्यांची राजधानी, स्वातंत्र्याचे आंदोलनात पुणे हे अग्रभागी होते. आज पुणे हे महत्त्वाचे शैक्षणिक, सांस्कृतिक, औद्योगिक व व्यापारी केंद्र बनले आहे.

महाराष्ट्राची संत परंपरा येथेच उगम पावली व पूर्णत्त्वाला पोहोचली. ज्ञानदेवानी आळंदी क्षेत्रात वारकरी सांप्रदायाचा पाया घातला तर तुकारामांनी कळस चढविला. मराठी राज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज याच जिल्ह्यात शिवनेरी किल्ल्यावर जन्मले व त्यांनी या जिल्ह्यातच आपल्या हिंदवी स्वराज्याची स्थापना केली होती.

## ३.३ पुणे जिल्ह्याचे भौगोलिक स्थान :

जिल्हा १७.५° व १९.२° उत्तर अक्षांश आणि ७३.२° व ७५.१° पूर्व रेखांश मध्ये वसला आहे. पुणे जिल्ह्याच्या उत्तर आणि पूर्व बाजूस अहमदनगर जिल्हा, दक्षिणेला सातारा व पश्चिमेला राजगड जिल्हा आहे. आग्रेय दिशेला सोलापूर जिल्हा असून वायव्येला ठाणे जिल्हा आहे. जिल्ह्याच्या जमिनीचे उंच सखलपणामुळे घाटमाथा, मावळ आणि पठार असे तीन स्वाभाविक विभाग पडतात. जुन्नर, आंबेगाव, मावळ, मुळशी, बेल्हे व भोर हे तालुके घाटमाथ्यावर असून उर्वरीत ८ तालुके आणि मावळचा काही भाग हा पठारी भागात आहे. पुणे जिल्ह्याचे पठार समपातळीवर नाही. पठाराचा पश्चिम कडा उंच आहे. सह्याद्री पर्वताच्या मोठ्या रांगा उत्तरेकडून दक्षिणेस पसरल्या आहेत. जिल्ह्यातील अ) हरिश्चंद्र पर्वत, ब) जीवधान, क) ढाक आहुपे या महत्त्वाच्या डोंगर रांगा आहेत. पुणे जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्रफळ १५६४८ चौरस किलोमीटर आहे ते महाराष्ट्र राज्याच्या एकूण क्षेत्रफळाच्या ५% इतके आहे.[३] जिल्ह्याच्या एकूण क्षेत्रफळाची तालुक्याप्रमाणे विभागणी पुढील तक्ता क्रमांक ३.१ व आलेख क्रमांक ३.१ मध्ये दर्शवली आहे.

**तक्ता क्रमांक ३.१**

**तालुकानिहाय क्षेत्रफळ**

| अ.क्र. | तालुका | क्षेत्रफळ (हेक्टर) | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | जुन्नर | १३८४५२ | ९% |
| २. | आंबेगाव | १०४२७५ | ७% |
| ३. | शिरूर | १५५७२७ | १०% |
| ४. | खेड | १३७३५४ | ९% |
| ५. | मावळ | ११३१३५ | ७% |
| ६. | मुळशी | १०३९३१ | ७% |
| ७. | हवेली | १३३६२७ | ९% |
| ८. | पुणे शहर | ११९९० | १% |
| ९. | दौंड | १२८९८६ | ८% |
| १०. | पुरंदर | ११०३५३ | ७% |
| ११. | वेल्हे | ४९९५५ | ३% |
| १२. | भोर | ८९२३४ | ६% |
| १३. | बारामती | १३८२४८ | ९% |
| १४. | इंदापूर | १४६७९१ | ९% |
| एकूण | | १५६२०५८ | १००% |

**संदर्भ :** District Census Handbook, Pune 2003.

### आलेख क्रमांक ३.१

### तालुकावार क्षेत्रफळ (हेक्टर)




आधार : तक्ता क्रमांक ३.१

वरील तक्ता क्रमांक ३.१ व आलेख क्रमांक ३.१ वरून असे निदर्शनास येते की, पुणे जिल्ह्यात सर्वात जास्त क्षेत्रफळ शिरूर तालुक्याचे (१५५७२७ हेक्टर) असून त्याचे एकूण क्षेत्रफळाशी प्रमाण १०% आहे. आंबेगाव, पुरंदर, मुळशी व मावळ यांचे क्षेत्र ७% हिस्सा आहे. तर दौंडचे ८% हिस्सा आहे. इंदापूर, बारामती, हवेली, खेड व जुन्नर याचे क्षेत्रफळ प्रत्येकी ९% हिस्सा आहे. भोरचा हिस्सा ६% आहे व वेल्हा ३% हिस्सा आहे तर पुणे शहर या तालुक्याचे सर्वात कमी क्षेत्रफळ म्हणजे (११९९० हेक्टर) आहे त्याचे प्रमाण १% असल्याचे दिसून येते.

## ३.४ प्रशासकीय रचना :

जिल्ह्याचे प्रशासकीय मुख्य ठिकाण पुणे येथे आहे. हे ठिकाण राज्याच्या मुंबई या राजधानी पासून रेल्वेने १९२ कि.मी. तर रस्त्याने १६० कि.मी. अंतरावर असून मुंबई बंगलोर या राष्ट्रीय महामार्गावर आहे. जिल्ह्यात १४ तहसील असून ते पुढीलप्रमाणे आहेत. १. जुन्नर, २. आंबेगाव, ३. शिरूर, ४. खेड, ५. मावळ, ६. मुळशी, ७. हवेली, ८. पुणे शहर, ९. दौंड, १०.पुरंदर, ११. वेल्हा, १२.भोर, १३. बारामती, १४ इंदापूर या तालुक्याचा समावेश होतो.[४]

जिल्ह्यात पुणे व पिंपरी-चिंचवड या दोन महानगरपालिका असून पुणे, खडकी आणि देहूरोड येथे कटक मंडळे आहेत. त्याचप्रमाणे खेड तालुक्यात आळंदी, पुरंदरमध्ये सासवड व

जेजुरी, मावळमध्ये तळेगाव-दाभाडे व लोणावळा आणि भोर, दौंड, बारामती, शिरूर, जुन्नर व इंदापूर तालुक्यांमध्ये प्रत्येकी एक याप्रमाणे जिल्ह्यात एकूण अकरा नगरपालिका आहेत. पुणे शहर तालुका वगळता उर्वरित १३ तालुक्यांत पंचायत समित्या आहेत. जिल्ह्यात एकूण १८६६ खेडी आहेत त्यापैकी १८ खेडी ओसाड आहेत.[५] पुणे जिल्ह्यात डिसेंबर २०१० अखेर १४०७ ग्रामपंचायती असल्याचे दिसून येते.

## ३.५ पुणे जिल्ह्याची लोकसंख्या :

महाराष्ट्र राज्यामध्ये पुणे जिल्ह्याची अधिकृत लोकसंख्या प्रसिद्ध करताना भारत सरकार जनगणना २०११ च्या अहवालानुसार पुणे जिल्ह्यातील वेगवेगळ्या घटकांशी संबंधीत लोकसंख्या पुढील तक्ता क्रमांक ३.२ व आलेख क्रमांक ३.२ मध्ये दर्शवली आहे.

**तक्ता क्रमांक ३.२**

**पुणे जिल्ह्यातील लोकसंख्या**

| तपशील | वर्ष २०११ | वर्ष २००१ |
|---|---|---|
| एकूण लोकसंख्या | ९४,२६,९५९ | ७२,३२,५५५ |
| पुरुष | ४९,३६,३६२ | ३७६९,१२८ |
| स्त्रिया | ४४,९०,५९७ | ३४,६३,४२७ |
| लोकसंख्या वाढीचे प्रमाण | ३०.३४% | ३०.७३% |
| क्षेत्रफळ चौ. कि.मी. | १५६४३ | १५६४३ |
| घनता/कि.मी. | ६०३ | ४६२ |
| महाराष्ट्राच्या तुलनेत लोकसंख्या | ८.३९% | ७.४७% |
| लिंग भेद प्रमाण (प्रती १०००) | ९१० | ९१९ |
| लहान मुलांचे प्रमाण (०-६ वर्ष) | ८७३ | ९०२ |
| सरासरी साक्षरता | ८७.१९% | ८०.४५% |
| पुरुष | ९२.७२% | ८८.३४ |
| स्त्रिया | ८१.१३% | ७१.८९% |
| एकूण मुलांची लोकसंख्या (०-६ वर्ष) | १०६७२६१ | ९६८८५१ |
| मुले लोकसंख्या (०-६ वर्ष) | ५६९९१६ | ५०९३६७ |
| एकूण साक्षरता | ७२८८५१७ | ५०३९२९० |
| पुरुष साक्षरता | ४०४८६५० | २८७९७६१ |
| स्त्रिया साक्षरता | ३२३९८६७ | २१५९५२९ |
| एकूण मुलांचे प्रमाण | ११.३२% | १३.४०% |
| मुलांचे प्रमाण | ११.५५% | १३.५१% |
| मुलींचे प्रमाण | ११.०१% | १३.२७% |

**संदर्भ : गृहमंत्रालय, राज्य जनगणना - २०११, महाराष्ट्र राज्य, स्टेट सेन्सस सन २०११ महाराष्ट्र सांख्यिकी विभाग पुणे**

## आलेख क्रमांक ३.२

## तालुकावार क्षेत्रफळ (हेक्टर)




आधार : तक्ता क्रमांक ३.२

वरील तक्ता क्रमांक ३.२ व आलेख क्रमांक ३.२ वरून असे निदर्शनास येते की, सन २०११ नुसार पुणे जिल्ह्याची लोकसंख्या ९४,२६,९५९ होती. यामध्ये पुरूष ४९,३६,३६२ आणि महिलांचे प्रमाण ४४,९०,५९७ असे आहे. सन २००१ च्या तुलनेने ३०.३४ टक्के लोकसंख्येत वाढ झाली आहे, तर सन १९९१ च्या तुलनेने ३०.७३ टक्के जिल्ह्याची लोकसंख्या वाढलेली आहे. जिल्ह्यातील १५६४३ चौरस किलोमीटरच्या परिसरातील प्राथमिक अंदाजानुसार लोकसंख्येची घनता ६०३ आहे. ही घनता सन २००१ च्या तुलनेबरोबर आहे.

सन २००१ च्या तुलनेने सन २०११ मध्ये साक्षर व्यक्तींचे प्रमाण ८०.४५ टक्क्यावरून ८७.१९ टक्के पर्यंत वाढ झाली आहे. पुणे जिल्ह्यातील साक्षरतेचे लिंगभेदानुसार प्रमाण पाहिले असता पुरुष आणि महिलांचे प्रमाण ९२.७२ टक्के व ८१.१३ टक्के क्रमश: आहे. सन २००१ मध्ये पुणे जिल्ह्याची लोकसंख्या ७२,८८,५१७ होती. त्यामध्ये साक्षरतेचे प्रमाण पुरुष ८८.३४ टक्के व महिला ७१.८९ टक्के होते. भारताच्या जनगणनेच्या लिंगभेदानुसार सन २००१ मध्ये पुणे जिल्ह्याच्या १००० लोकसंख्येत महिलांचे प्रमाण ९१९ होते.परंतु सन २०११ च्या आकडेवारीनुसार १००० पुरुषांमागे महिलांचे प्रमाण ९१० आहे. भारताच्या जनगणनेनुसार १००० पुरुषांमागे महिलांचे प्रमाण ९४० असे आहे.

सन २००१ च्या तुलनेने सन २००१ मध्ये साक्षर व्यक्तींचे प्रमाण ८०.४५ टक्क्यावरून ८७.१९ टक्के पर्यंत वाढ झाली आहे. पुणे जिल्ह्यातील साक्षरतेचे लिंगभेदानुसार प्रमाण पाहिले असता पुरुष आणि महिलांचे प्रमाण ९२.७२ टक्के व ८१.१३ टक्के क्रमश: आहे. सन २००१ मध्ये पुणे जिल्ह्याची लोकसंख्या ८२,८८,५१७ होती. त्यामध्ये साक्षरतेचे प्रमाण पुरुष ८८.३४ टक्के व महिला ७१.८९ टक्के होते.

भारताच्या जनगणनेच्या लिंगभेदानुसार सन २००१ मध्ये पुणे जिल्ह्याच्या १००० लोकसंख्येत महिलांचे प्रमाण ९१९ होते. २०११ च्या आकडेवारीनुसार १००० पुरुषांमागे महिलांचे प्रमाण ९१० आहे. भारताच्या जनगणनेनुसार १००० पुरुषांमागे महिलांचे प्रमाण ९४० असे आहे.

पुणे जिल्ह्यातील तुलनात्मक लोकसंख्या आकडेवारीचा विचार केल्यास सन २००१ मधील जनगणना आणि २०११ नुसार जनगणना मध्ये ग्रामीण व शहरी असे दोन विभाग प्रामुख्याने दिसून येतात. ती पुढील तक्ता क्रमांक ३.३ मध्ये दर्शवली आहे.

**तक्ता क्रमांक ३.३**

**पुणे जिल्ह्याची ग्रामीण व शहरी लोकसंख्या**

| तपशील | ग्रामीण | शहरी |
|---|---|---|
| लोकसंख्या (%) | ३९.११ | ६०.८९ |
| एकूण लोकसंख्या | ३८,८७,२४३ | ५७,३९,७१६ |
| पुरुष | १९१३७७७ | ३०२२५८५ |
| महिला | १७७३४६६ | २७१७१३१ |
| लिंग भेद प्रमाण | ९२७ | ८९९ |
| मुलांची लोकसंख्या | ४२३९६९ | ६४३२९२ |
| मुले (०-६) | २२७७९४ | ३४२१२२ |
| मुली (०-६) | १९६१७५ | ३०११७० |
| मुलांची टक्केवारी (०-६) | ११.५० | ११.२१ |
| मुले टक्केवारी | ११.९० | ११.३२ |
| मुली टक्केवारी | ११.०६ | ११.०८ |
| एकूण साक्षरता | २६४०८४९ | ४६४७६८८ |
| पुरुष | १५०५०८९ | २५४३५८९ |
| महिला | ११३५७६० | २१०४१०७ |
| साक्षरता सरासरी | ८०.९३ | ९१.१९ |
| पुरुष | ८९.२७ | ९४.८९ |
| महिला | ७२.०१ | ८७.०९ |

**संदर्भ : गृहमंत्रालय, राज्य जनगणना - २०११, महाराष्ट्र राज्य, स्टेट सेन्सस सन २०११ महाराष्ट्र सांख्यिकी विभाग पुणे**

वरील तक्ता क्रमांक ३.३ वरून असे निदर्शनास येते की, जिल्ह्याच्या एकुण लोकसंख्येत ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण ३९.११ टक्के असून शहरी ६०.८९ टक्के लोकसंख्या आहे. या वरून ग्रामीण व शहरी २:३ असे प्रमाण आढळून येईल. याचाच अर्थ ४० टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात आढळली तर शहरात ६० टक्के लोकसंख्या शहरात राहत आहे. प्रामुख्याने २००१ च्या तुलनेने ग्रामीण भागात लोक जास्त प्रमाणात राहण्यास प्राधान्य देतात. सावित्रीबाई फुले स्त्री दत्तक योजनेनुसार सन २०११ मध्ये मुलींची टक्केवारी १०.०६ टक्केवरून ११.९० टक्के पर्यंत वाढलेली आहे. यावरून असा निष्कर्ष काढता येईल की, साक्षरता सरासरीमुळे स्त्री-भ्रूण हत्या अलीकडे कमी झालेली आहे असे दिसून येते.

जिल्ह्यातील (०-६) वयोगटातील लोकसंख्या आकडेवारी गृहीत धरलेली आहे. सन २००१ आणि सन २०११ जलगणनेनुसार वयोगट (०-६) असा आहे. सन २००१ च्या जनगणनेनुसार २.०८ टक्के आहे, तर सन २०११ च्या जनगणनेत मुलांच्या वयोगटात वाढ झालेली आहे. एकूण महाराष्ट्र राज्याच्या जनगणनेनुसार सन २०११ मध्ये पुणे जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येत ८.३९ टक्के वाढ झालेली दिसून येते.

पुणे जिल्ह्यातील लोकसंख्येचा विचार करतांना जिल्ह्यातील तालुकावार लोकसंख्येचा अभ्यास करणे महत्त्वाचे असून त्यासंबंधीची माहिती पुढील तक्ता क्रमांक ३.४ मध्ये दर्शवली आहे.

**तक्ता क्रमांक ३.४**

**जिल्ह्यातील तालुकानिहाय लोकसंख्या**

| अ.क्र. | तालुका | १९९१ | २००१ |
|---|---|---|---|
| १. | जुन्नर | ३०३ | ३७० |
| २. | आंबेगाव | १८६ | २०० |
| ३. | शिरूर | २४७ | ३११ |
| ४. | खेड | २८३ | ३५७ |
| ५. | मावळ | २४२ | ३०५ |
| ६. | मुळशी | १२३ | १२७ |
| ७. | हवेली | ११४४ | १३४७ |
| ८. | पुणे शहर | १७३५ | २६९७ |
| ९. | दौंड | २६३ | ३४१ |
| १०. | पुरंदर | १९२ | २२४ |
| ११. | वेल्हे | ५३ | ५५ |
| १२. | भोर | १५४ | १७१ |
| १३. | बारामती | ३१० | ३७३ |
| १४. | इंदापूर | २८७ | ३४९ |

**संदर्भ : पुणे जिल्हा आर्थिक व सामाजिक अहवाल २००२-०३.**

वरील तक्ता क्रमांक ३.४ वरून असे निदर्शनास येते की, पुणे जिल्ह्यातील सर्वच तालुक्यांमध्ये लोकसंख्येत १९९१ च्या तुलनेत २००१ मध्ये वाढ झाली आहे. विशेषत: हवेली येथे या काळात वार्षिक सरासरी १.७७ टक्के ने लोकसंख्येत वाढ झाली आहे. तर पुणे शहरात याच काळात वार्षिक सरासरी ५.५४ टक्के लोकसंख्येत वाढ झाली आहे. या लोकसंख्या वाढीमुळे या दोन शहरात नागरी सुविधांचा पुरवठा वाढवण्यावर भर द्यावा लागला आहे. त्यामुळे या शहराचा विकास फारच झपाट्याने झाला आहे असे दिसून येते.

पुणे जिल्ह्यातील लोकसंख्येत साक्षर लोकसंख्येचे प्रमाण किती आहे याचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. त्या संबंधीची माहिती पुढील तक्ता क्रमांक ३.५ मध्ये दर्शवली आहे.

**तक्ता क्रमांक ३.५**

**पुणे जिल्ह्यातील साक्षरता**

| अ. क्र. | वर्षे | पुरुष | | स्त्रिया | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| १. | १९८१ | १४०१ | ६५.१६% | ८४९ | ४२.१४% | २२५० | ५४.०३% |
| २. | १९९१ | १९५८ | ८१.५६% | १३३७ | ५९.७७% | ३२९५ | ७१.०५% |
| ३. | २००१ | २९०५ | ८८.५५% | २१८० | ७२.३२% | ५०८६ | ८०.७८% |

**संदर्भ : पुणे जिल्हा आर्थिक व सामाजिक अहवाल २००२-०३.**

वरील तक्ता क्रमांक ३.५ वरून असे निदर्शनास येते की, सन १९८१ ला जिल्ह्यात साक्षरतेचे एकूण प्रमाण ५४.०३ टक्के एवढे होते. यात वाढ होऊन सन २००१ ला हे साक्षरतेचे प्रमाण ८०.७८ टक्के ने वाढले आहे. तर महिला साक्षरतेचे प्रमाण याच काळात ४२.१४ टक्के वरून ७२.३२ टक्के पर्यंत वाढले आहे. तसेच या काळात पुरुषांचे साक्षरतेचे प्रमाण ६५.१६ टक्के वरून ८८.५५ टक्के पर्यंत वाढले आहे. यावरून पूर्ण जिल्ह्याला साक्षरता अभियान मोठ्या प्रमाणात यशस्वी झाल्याचे दिसून येते.

पुणे जिल्ह्यातील लोकसंख्येचा अभ्यास करतांना जिल्ह्यातील तालुकावार साक्षर लोकसंख्ये संबंधीची माहिती पुढील तक्ता क्रमांक ३.६ व आलेख क्रमांक ३.३ मध्ये दर्शवली आहे.

तक्ता क्रमांक ३.६ व आलेख क्रमांक ३.३ वरून असे दिसून येते की, पुणे जिल्ह्यात साक्षरतेचे प्रमाण सन २००२-०३ ला ८०.७८ टक्के इतके होते. तालुक्यांचा विचार केला असात सर्वात जास्त साक्षरतेचे प्रमाण पुणे शहरात आहे ते ८७.१५ टक्के इतके आहे. तर सर्वात कमी ६८.०१ टक्के एवढे प्रमाण मुळशी तालुक्याचे आहे. पुणे जिल्ह्यात सर्व तालुक्यामध्ये साक्षरतेचे प्रमाण निश्चित चांगले आहे. परंतु अद्याप १०० टक्के साक्षरतेचे दिसून येत नाही.

## तक्ता क्रमांक ३.६

## जिल्ह्यातील तालुकावार साक्षरता लोकसंख्या

| अ.क्र. | तालुके | साक्षर पुरुष | साक्षर स्त्रिया | एकूण साक्षर | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| १. | जुन्नर | १३९९०३ | १०२४४३ | २४२३४६ | ७५.५६% |
| २. | आंबेगाव | ८०३६२ | ५७९०९ | १३८२७१ | ७४.२२% |
| ३. | शिरूर | ११५६७१ | ८०७३७ | १९६४०८ | ७३.५३% |
| ४. | खेड | १२८२५५ | ८५३३१ | २१३५८३ | ७२.३९ |
| ५. | मावळ | ११९२४९ | ८१३६६ | २००६१५ | ७६.३९ |
| ६. | मुळशी | ४५२४१ | २८७४० | ७३९८१ | ६८.०१% |
| ७. | हवेली | ५६४९०८ | ४०९४२१ | ९७४३२९ | ८३.८५% |
| ८. | पुणे शहर | ११५१०६० | ९३२४६५ | २०८३५२५ | ८७.१५% |
| ९. | दौंड | १२६४५६ | ८९७१८ | २१६१७४ | ७३.९८% |
| १०. | पुरंदर | ८६७५५ | ६४६०० | १५१३५५ | ७७.५४% |
| ११. | वेल्हे | १६५७८ | ११३८७ | २८९६४ | ६२.१९% |
| १२. | भोर | ६२३९५ | ४६९६७ | १०९३६२ | ७३.९६% |
| १३. | बारामती | १४११२९ | १०२२८४ | २४३७१३ | ७५.३२% |
| १४. | इंदापूर | १२६५०८ | ८७१०३ | २१३६११ | ७१.४५% |
| एकूण | | २९,०५,७७० | २१,८०,४७१ | ५०,८६,२४० | ८०.७८% |

संदर्भ : पुणे जिल्हा आर्थिक व सामाजिक अहवाल २००२-०३.

## आलेख क्रमांक ३.३

## तालुकावार साक्षर लोकसंख्या (हेक्टर)




आधार : तक्ता क्रमांक ३.६

जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येत कोणत्या वयोगटातील लोकांचे प्रमाण किती आहे यांसंबंधीची माहिती तक्ता क्रमांक ३.७ मध्ये दर्शवली आहे.

**तक्ता क्रमांक ३.७**

**जिल्ह्यातील वयोमानानुसार लोकसंख्या**

| अ. क्र. | वयोगट | १९९१ | |
|---|---|---|---|
| | | लोकसंख्या | शेकडा प्रमाण |
| १. | ० ते १४ | १८८५६९८ | २२.९७% |
| २. | १५ ते ५९ | ३२३९३९० | ५८.३२% |
| ३. | ६० पेक्षा जास्त | ३८२२४६ | ६.८७% |
| ४. | एकूण | ५५०७३३४ | १००% |

**संदर्भ : पुणे जिल्हा आर्थिक व सामाजिक अहवाल २००२-०३.**

वरील तक्ता क्रमांक ३.८ वरून असे निदर्शनास येते की, पुणे जिल्ह्यात बालकांचे प्रमाण ० ते १४ या वयोगटातील लोकसंख्या १८८५६९८ असून त्यांचे एकूण लोकसंख्येशी असणारे प्रमाण २२.९७ टक्के आहे. तर काम करणाऱ्या लोकांचे प्रमाणे १५ ते ५९ या वयोगटातील प्रमाण ५८.३२ टक्के आहे. तर ६० ते ८० वयोगटातील वृद्ध लोकांचे प्रमाण ६.८७ टक्के आहे. यावरून जिल्ह्यात काम करणाऱ्या लोकांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात असल्याचे दिसून येते.

## ३.६ मृदा, कृषी उत्पादने व पिके :

जिल्ह्यातील ज्वारी हे महत्त्वाचे पीक असून सन २०१०-११ मध्ये ज्वारी पिकाखालील क्षेत्र एकूण पिकाखालील क्षेत्राच्या ४१ टक्के इतके होते. त्याखालील बाजरी हे महत्त्वाचे पीक असून त्याखालील क्षेत्र एकूण पिकाखालील क्षेत्राच्या ९ टक्के होते. भात व गहू या पिकाखालील क्षेत्र प्रत्येकी ५ टक्के होते. तर तृणधान्याखालील ६३ टक्के क्षेत्र होते व कडधान्याखाली ८ टक्के इतके क्षेत्र होते. खेड, भोर, मावळ, बेल्हे, जुन्नर व आंबेगाव या तालुक्यामध्ये जिल्ह्यातील भाताच्या पिकाखालील जास्त क्षेत्र आहे. पश्चिमेकडील डोंगराळ भागात भाताचे पीक उत्तम येते.[६] बारामती या भागात कापसाचे व ऊसाचे पीक उत्तम येते. तसेच इंदापूर, बारामती, दौंड व पुरंदर तालुक्यात ज्वारीचे पीक उत्तम येते. खेड, जुन्नर, आंबेगाव या भागात भुईमूगाचे पीक चांगले येते.

## ३.७ जिल्ह्यातील नद्या व प्रकल्प:

भीमा नदी ही जिल्ह्यातील प्रमुख नदी आहे. ती पुणे जिल्ह्याच्या पश्चिमेस सह्याद्री पर्वतातील भीमाशंकर येथे उगम पावते. जिल्ह्यातून दक्षिणपूर्व अशी वाहत जाऊन ती सोलापूर

जिल्ह्यात प्रवेश करते. भीमा नदीच्या डाव्या बाजूस वेळू, घोड आणि उजव्या बाजूस भामा, इंद्रायणी, मुळा व मुठा अशा उपनद्या आहेत. पुणे जिल्ह्याच्या दक्षिण सरहद्दीवर नीरा नदी आहे. कऱ्या, कुकडी, पवना, मीना, गुंजवणी, पुष्पावती, शिवगंगा अशा अन्य नद्या पुणे जिल्ह्यातून वाहतात.[७] या सर्व नद्या पावसाळ्यात दुथडी भरून वाहतात व उन्हाळ्यात कोरड्या पडतात. पुणे जिल्ह्याच्या प्रत्येक तालुक्यातून किमान एकतरी नदी वाहते आहे.

जिल्ह्यात सन २००१ पर्यंत १६ मोठे प्रकल्प (६८१ हजार हेक्टर), ९ मध्यम प्रकल्प (५५ हजार हेक्टर) व ८२३ लघु प्रकल्प (२१३ हेक्टर) प्रकल्प पूर्ण झाले आहेत. भाटघर, पानशेत, वरसगाव, खडकवासला, पवना, डिंभे, येडगाव, वडज, माणिकडोह, चासकमान, नाझरे, वरवंड, शिरसुफळ, शेटफळ इ. महत्त्वाची धरणे जिल्ह्यात आहेत.[८]

## ३.८ हवामान व पर्जन्यमान :

पुणे जिल्ह्याचे उन्हाळ्यातील हवामान उष्ण असते. पूर्वेकडील इंदापूर, दौंड व बारामती या तालुक्यातील हवामान जास्त उष्ण असते व पश्चिमेकडे ते थंड आढळते. जिल्ह्यात बराचसा पाऊस नैऋत्य मोसमी वाऱ्यापासून पडतो. पश्चिमेकडून जसजसे पूर्वेकडे जावे तसतसा तो कमी होतो व अगदी पूर्वेच्या टोकास अंदाजे ६०० ते ७०० मिलीमीटर पाऊस पडतो, तर पश्चिमेस ११७१ मिलीमीटर पाऊस पडतो.

पुणे जिल्ह्यातील प्रमुख नदी भीमा असून ती पुणे जिल्ह्याच्या पश्चिमेस सह्याद्री पर्वतातील भीमाशंकर येथे उगम पावते. जिल्ह्यातून दक्षिणपूर्व अशी वाहत जाऊन भीमा नदी सोलापूर जिल्ह्यात प्रवेश करते.[९] भीमा नदीस इंद्रायणी मुळा व मुठा या उपनद्या आहेत. पुणे जिल्ह्याच्या दक्षिण सरहद्दीवर निरा नदी आहे. कऱ्हा, कुकडी, पवना, सीना, गुंजवणी, पुष्पावती, शिवगंगा अशा नद्या पुणे जिल्ह्यातून वाहतात. या सर्व नद्या पावसाळ्यात दुथडी भरून वाहतात व उन्हाळ्यात कोरड्या पडतात. पुणे जिल्ह्याच्या प्रत्येक तालुक्यातून नदी वाहत आहे.

## ३.९ जमीन क्षेत्र :

घाटमाध्यावरील जमीन हलकी व तांबड्या रंगाची आढळते. जिल्ह्याच्या इतर भागातील जमीन काळी, तांबडी व किरमिजी रंगाची असून त्यात काही ठिकाणी वाळू व चुनखडी यांचे मिश्रण आढळते. पश्चिमेकडून जसजसे पूर्वेकडे जावे तसतशी जमीन कसदार व सुपीक आढळते.

पश्चिमेकडील तालुक्यात ती तांबडी व हलकी आहे. सोने, रूपे, तांबे, लोखंड अशा प्रकारचे मौल्यवान धातू जिल्ह्यात सापडत नाहीत. मात्र इमारतीला लागणाऱ्या मजबूत काळ्या दगडाच्या खाणी पुणे जिल्ह्यात आहेत. शिवाय गारेचे दगड, रंगासाठी लागणारी लोणारी व गेरूची लाल माती जिल्ह्यात सापडते. पुणे जिल्ह्याच्या पूर्व भागात चुनखडी सापडते.

### ३.१० नैसर्गिक साधन संपत्ती :

### ३.१०.१ रस्ते :

शासन व जिल्हा परिषद व नगर परिषदा यांचे मार्फत रस्ते तयार करणे. त्यांची निगा राखणे ही कामे केली जातात. जिल्ह्यामध्ये मार्च २०११ अखेर शासकीय व जिल्हा परिषद यांचे अनुक्रमे ४६०१ व ९२८१ किमी लांबीचे रस्ते होते. नगरपालिका हद्दीतील १३० किमी लांबीचे रस्ते होते. त्यापैकी १३ टक्के रस्ते राष्ट्रीय व राज्य महामार्ग होते तर ४० टक्के जिल्हा व इतर जिल्हा रस्ते होते. पृष्ठभागाचे वर्गीकरणानुसार ५७ टक्के डांबरी आणि २० टक्के खडीचे पक्के रस्ते आहेत. जिल्ह्यामध्ये मुंबई-बेंगलोर, पुणे-हैदराबाद व पुणे-नाशिक हे ३ राष्ट्रीय महामार्ग आहेत.

### ३.१०.२ शैक्षणिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक :

जिल्ह्यातील पुणे विद्यापीठ, भारती विद्यापीठ, सिंम्बॉयसीस संस्था, सिंहगड इंस्टिट्युट इत्यादी संस्थामधून कला, वाणिज्य, शास्त्र, वैद्यकीय, अभियांत्रिकी व संगणक शाखेत केवळ याच राज्यातील नव्हे तर देशातील तसेच परदेशातील विद्यार्थिही शिक्षण घेत आहेत. याशिवाय महर्षि कर्वे स्त्री शिक्षण संस्था, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ NDA लष्करी संस्था, सी-डॅक, आयुका, भारतीय शिक्षण संस्था, प्रकाशन व साहित्य संस्था, भांडारकर संस्था, बालभारती, गोखले अर्थशास्त्र संस्था इत्यादी संस्थाही पुणे शहरात संशोधनाचे व विद्यादानाचे कार्य करीत आहेत.

### ३.१०.३ पर्यटन स्थळे

जिल्ह्यामध्ये पर्यटकांना आकर्षित करणारी अनेक ठिकाणे आहेत. त्यापैकी खंडाळा, लोणावळा ही थंड हवेची ठिकाणे, शिवनेरी, सिंहगड, पुरंदर, राजगड, तोरणा, लोहगड, विसापूर इत्यादी ऐतिहासिक महत्त्व असलेले किल्ले, मावळ तालुक्यातील कार्ला व भाजे येथील लेणी, धार्मिकदृष्ट्या महत्त्व असलेले अष्टविनायकापैकी मोरगाव, रांजणगाव, थेऊर, ओझर, लेण्याद्रि येथील पाच गणपती, जेजुरीचा खंडोबा, ज्ञानेश्वरांची आळंदी तसेच तुकाराम महाराजांची ज्या ठिकाणाहून सदेह वैकुंठ गमन केले असे देहू क्षेत्र, चिंचवडचे मोरया गोसावी समाधी स्थळ, बारा

ज्योतिर्लिंगापैकी श्रीक्षेत्र भीमाशंकर, दत्ताचे ठिकाण असलेले नारायणपूर, सोमयाचे कारंजे व नव्याने पुरंदर तालुक्यात उभारण्यात आलेले केतकावळे येथील बालाजी मंदिर हे याच जिल्ह्यात आहेत.

**३.१०.४ धार्मिक स्थळे :**

पुणे शहरातील कसबा गणपती, सारसबाग गणपती, दगडूशेठ गणपती, मंडई गणपती, जंगली महाराज मंदिर, चतु:शृंगी देवीचे मंदिर, चांदनी चौकातील वेदभवन, पर्वती टेकडी व मंदिर, पाताळेश्वर गुंफा, विश्रामबाग वाडा, शनिवारवाडा, लालमहाल, केसरीवाडा, आगाखान राजवाडा-कस्तुरबा गांधी स्मारक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर वस्तू संग्रहालय, महात्मा फुले वस्तू संग्रहालय, आदिवासी सांस्कृतिक संग्रहालय, राजा केळकर संग्रहालय इत्यादी स्थळांना राज्यातून, परराज्यातून तसेच परदेशातून आलेले अनेक पर्यटक भेटी देतात.

जिल्ह्यात बालेवाडी परिसरात श्री. शिवछत्रपती स्टेडीयम उभारण्यात आलेले आहे. पुणे शहरालगत हिंजवडी, हडपसर येथे माहिती तंत्रज्ञान पार्क, (I.T. Park) उभारण्यात आलेले आहे. तसेच पुणे, पिंपरी-चिंचवड, आकुर्डी, चाकण, पिरंगुट, रांजणगाव, कुरकुंभ व बारामती इत्यादी ठिकाणी औद्योगिक वसाहती उभारण्यात आलेल्या आहेत.[१०]

**३.११ स्थानिक स्वराज्य संस्था :**

जिल्ह्यात पुणे येथे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यालय असून १३ ठिकाणी पंचायत समिती कार्यालये आहेत. जिल्हा परिषदेचे २००९-२०१० चे प्रत्यक्ष निव्वळ उत्पन्न १०६९.६३ कोटी रूपये आहे. तर खर्च रूपये ८३२.१७ कोटी झाला आहे.[११] पुणे जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्था संबंधीची माहिती पुढील तक्ता क्रमांक ३.८ मध्ये दर्शवली आहे.

**तक्ता क्रमांक ३.८**

**स्थानिक स्वराज्य संस्था संबंधीची माहिती**

| अ.क्र. | प्रकार | संख्या | पुणे | महाराष्ट्र |
|---|---|---|---|---|
| १ | महानगरपालिका | संख्या | २ | २३ |
| २ | नगरपरिषदा | संख्या | ११ | २२२ |
| ३ | कटक मंडळे | संख्या | ३ | ७ |
| ४ | पंचायत समिती | संख्या | १३ | ३५५ |
| ५ | ग्रामपंचायती | संख्या | १४०७ | २७९३३ |

स्रोत : पुणे जिल्ह्याचे समालोचन २०११

वरील तक्ता क्रमांक ३.८ वरून असे निदर्शनास येते की, पुणे व पिंपरी-चिंचवड या दोन महानगरपालिका तर देहूरोड, पुणे लष्कर व खडकी या तीन ठिकाणी कटक मंडळे आहेत. या शिवाय जिल्ह्यात ११ नगरपरिषदा, १३ पंचायत समित्या व जिल्ह्यात एकूण १४०७ ग्रामपंचायती आहेत तर राज्यात एकूण २७९३३ ग्रामपंचायती असल्याचे दिसून येते.

## ३.१२ औद्यागिक विकास :

१९४८ च्या फॅक्टरी ॲक्ट या कायद्यानुसार डिसेंबर २००९ अखेर ५३१७ कारखाने नोंदलेले होते.यापैकी ४१५२ चालू होते. या कारखान्यामध्ये ३२६०७४ कामगार काम करीत होते. जिल्ह्यात शेतीची औजारे, नांगर, पंप व इंजिने, कापड गिरण्या, औषधे, रबरी व प्लॅस्टिक वस्तू, साबण, नायलॉन, बिस्किटे, विजेचे सामान, भांडी, खेळणी असे छोटे कारखाने आहेत. खडकी व देहू रोडला केंद्र सरकारचा दारू गोळा बनवण्याचा कारखाना आहे. [१२]

जिल्ह्यात छोट्या उद्योगांचे प्रमाण वाढत आहे. जुन्नर येथे हात कागद व मेंढरांच्या लोकरीपासून घोंगड्या तयार करतात. जुन्नर व खेड तालुक्यात भुईमुगाचे तेल गिरण्या आहेत. बिड्या वळणे, दोर बांधणे, कोंबड्या पाळणे हे घरगुती व्यवसाय चालतात. पुणे जिल्ह्यात हवेली, जुन्नर, भोर, मुळशी, आंबेगाव येथे प्रत्येकी एक साखर कारखाने आहेत. दौंड, इंदापूर तालुक्यात प्रत्येकी ४ साखर कारखाने आहेत. असे एकूण १६ साखर कारखाने आहेत. यामध्ये दौंड तालुक्यातील ४ व बारामती तालुक्यातील २ असे ५ खाजगी साखर कारखाने आहेत. पुणे जिल्ह्यात (हडपसर, गुलटेकडी, पर्वती) बारामती, भोर, लोणावळा या ठिकाणी औद्योगिक वसाहती आहेत. याशिवाय महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एम.आय.डी.सी.) आहे.पिंपरी चिंचवड, भोसरी क्षेत्रात मोठे औद्योगिक क्षेत्र विकसीत केले आहे. बारामती, जेजुरी, कुरकुंभ येथे एम.आय.डी.सी. वसाहती विकसीत झालेल्या आहेत. [१३]

## ३.१३ पायाभूत सुविधा :

### ३.१३.१ वीज :

सन १९६०-६१ मध्ये जिल्ह्यातील फक्त २४ खेड्यांना वीज उपलब्ध होती. गेल्या ४५ वर्षात यात नेत्रदीपक प्रगती झाली असून, मार्च २००७ मध्ये खेड्यात विजेची सोय उपलब्ध झाली आहे. विद्युतीकरणाचा फायदा शेतकऱ्यांना विशेष होत आहे. २००६-०७ मध्ये जिल्ह्यात एकूण

९०७.९९ लाख किलोवॅट तास होता. घरगुती वीज वापरांचे प्रमाण १४.३६ टक्के असून, औद्योगिक वीज वापरांचे प्रमाण ५५.२९ टक्के असून, व्यापारी क्षेत्रात ५.१२ टक्के कृषी क्षेत्रात १८.१२ टक्के व सार्वजनिक दिवाबत्तीसाठी ७.१ टक्के वीज वापरली गेली. पुणे शहराला ८०० मेगावॅट विजेची आवश्यकता आहे.[१४]

**३.१३.२ उद्योग :**

पुणे शहर व त्याचा परिसर जरी आता अनेक उद्योग व्यवसायासाठी प्रसिद्ध असला तरी पूर्वी हे शहर उद्योगासाठी प्रसिद्ध नव्हते. पुण्यात कापड विणण्याच्या उद्योगाबरोबर महत्त्वाचा उद्योग म्हणजे तांब्या-पितळेची भांडी तयार करण्याचा होता. १८८५ मध्ये पुणे गॅझेटियरमध्ये दिलेल्या माहितीनुसार त्यावेळी पुण्यात तांब्या-पितळेची भांडी तयार करणारे ७० उत्पादक होते व त्यात २३२० कामगार काम करीत होते व सोन्या-चांदीचे दागिने बनविण्याचा उद्योग ही भरभराटीस आल्याचा उल्लेख आढळतो. १८८६ मध्ये पुणे नगरपालिकेचे अध्यक्ष खानबहादूर सरदार दोराबजी पद्‌मजी यांनी आपल्या बंधुच्या साहाय्याने मुंढवा येथे डेक्कन पेपर मिल्स ही कागदाची गिरणी सुरू केली. ब्रिटिश सरकारने १८६९ मध्ये खिडकी येथे अॅम्युनिशन फॅक्टरीची सुरुवात केली. तर १८९३ मध्ये रावबहादूर यांनी सुताचा कारखाना सुरू केला. १९०८ मध्ये तळेगाव येथे पैसा फंड काच कारखाना सुरू झाला. पहिल्या महायुद्धानंतर पुण्यात अनेक उद्योग उदयास आले.[१५]

१९४६ मध्ये किर्लोस्कर ऑईल इंजिन्सने पुण्याला कारखाना काढला. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर पुण्याच्या औद्योगिकीकरणला खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. १९५४-५५ मध्ये पिंपरी येथे हिंदुस्थान अँटिबायोटिक्स हा सरकारी मालकीचा कारखाना सुरू झाला. त्यानंतर ग्रीव्हज कॉटन उद्योग समुहातील रस्टन अॅड हॉर्नस्बी, कपूर इंजिनिअरिंग महिंद्र, बजाज अॅटो, बजाज टेंपो, सँडविक एशिया अॅटलास कॉप्को असे कारखाने सुरू झाले. १९५७ मध्ये पुणे महापालिकेने हडपसर येथे औद्योगिक वसाहत सुरू केली व पहिली १५ वर्षे जकात माफीची घोषणा केली.[१६] १९६० नंतर महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाने भोसरी येथे ४००० एकर जागा घेऊन औद्योगिक वसाहतीचा विकास केला. त्यामुळे तेथे टेल्को, सेंचूरी एन्का, फिलिप्स अशा नामवंत कंपन्या आल्या. १९४८ च्या फॅक्टरी अॅक्ट कायद्यानुसार डिसेंबर २००५ अखेर पुणे जिल्ह्यात ३७८५ कारखाने नोंदले गेले आहेत. त्यापैकी २४१८ कारखाने चालू होते. या कारखान्यामध्ये २०५०२१ कामगार काम करीत होते. जिल्ह्यात शेतीची अवजारे, नांगर, पंप व इंजिने, कापड गिरण्या, औषधे, रबरी प्लास्टिकच्या वस्तू साबण नायलॉन, बिस्कीटे, विजेचे

सामान, भांडी, लाकडाची खेळणी असे अनेक छोटे मोठे कारखाने आहेत. चिंचवड येथे रिक्षा, ट्रक व स्कूटर लोणी-काळभोर व पिंपरी येथे रेडिओ कारखाने आहे. जिल्ह्यात छोट्या उद्योगाचे प्रमाण वाढत आहे. जुन्नर येथे हातकागद बनविला जातो.[१७] याच तालुक्यात मेंढरे पाळून त्याच्या लोकरीपासून घोंगड्या विणण्याचा व्यवसाय चालतो. जुन्नर व खेड तालुक्यात भुईमूगाचे तेल काढण्याच्या अनेक गिरण्या आहेत. बिड्या वळणे, दोर वळणे, कोंबड्या पाळणे हे घरगुती उद्योग मोठ्या प्रमाणात चालतात. २००३-०४ मध्ये पुणे जिल्ह्यात एकूण १३ साखर कारखाने चालू होते हे सर्व साखर कारखाने सहकारी क्षेत्रात होते. हडपसर, गुलटेकडी, बारामती, भोर, चाकण, लोणावळा, रांजणगाव या ठिकाणी औद्योगिक वसाहती आहेत. याशिवाय महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने पिंपरी-चिंचवड, भोसरी क्षेत्रात मोठे औद्योगिक क्षेत्र विकसित केले आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या औद्योगिक वसाहती नव्याने बारामती, जेजुरी, कुरकुंभ येथे विकसित केल्या आहेत.[१८]

पुणे आता मोटार उद्योगाचे केंद्र झाले आहे. इतर अनेक प्रकारचे उद्योग असले तरी पुणे विभागात सर्वात जास्त गुंतवणूक मोटारी, स्कूटर, ट्रक्स यांच्या उत्पादनात व त्यांना माल पुरविण्याच्या पूरक लहान उद्योगात झाली आहे. २००१ ते २००५ या काळात या उद्योगात सुमारे १२८ नवे प्रकल्प आले असून, त्यात सुमारे ९००० लोकांना नवा रोजगार मिळाला आहे. भारत सरकारच्या ऑटो क्लस्टरच्या प्रकल्पामुळे या सर्व उद्योगांना यापुढे फार मोठी गती मिळणार आहे. पुण्याजवळ हिंजवडी येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाने माहिती तंत्रज्ञान उद्योगांना चालना मिळण्यासाठी आयटी पार्क उभा केला. याखेरीज औंध, पाषाण, हडपसर येथे नवे १५ आयटी पार्क उभारले आहेत. सध्या पुणे येथे सहाशे आयटी कंपन्या कार्यरत असून, आणखी मोठ्या देशी व बहुराष्ट्रीय कंपन्या येत आहेत. पुणे हे माहिती तंत्रज्ञानाची देशातील राजधानी लवकरच होईल व या क्षेत्रातील ते प्रथम क्रमांकाचे शहर ठरेल असा सर्वांचा कयास आहे.[१९]

सॉफ्टवेअर बरोबरच कॉल सेंटर्सचा नवा उद्योग पुणे परिसरात आला आहे. अनेक परदेशी कंपन्यांनी आपली कॉल सेंटर्स पुण्यात सुरू केली आहेत. त्यांच्या ग्राहकांना येथून सर्व माहिती मिळू शकते. अनेक तरुण-तरुणींना येथे मोठ्या प्रमाणात रोजगार मिळत आहे.

**३.१३.३ वाहतूक व दळणवळण :**

शासन व जिल्हा परिषद तसेच नगर परिषदा यांचेमार्फत रस्ते तयार करणे, त्यांची निगा राखणे ही कामे केली जातात. जिल्ह्यांमध्ये मार्च २००७ अखेर शासकीय व जिल्हा परिषद यांचे

अनुक्रमे ४७३३ व ९५४८ कि.मी. लांबीचे रस्ते होते. या व्यतिरिक्त नगरपालिका हद्दीतील ४० कि.मी. लांबींचे रस्ते होते. तसेच खडीचे पक्के रस्ते २८ रस्ते होते. जिल्ह्यातून मुंबई-बंगलोर, पुणे-हैद्राबाद, पुणे-नाशिक हे तीन राष्ट्रीय महामार्ग गेले आहेत. जिल्ह्यात मार्च २००७ अखेर २०, ३१, ६३२ स्वयंचलित वाहने असून, त्यापैकी १५,४०,४८२ वाहने व ३५२८२६ प्रवासी वाहने आहेत. तसेच जिल्ह्यामध्ये १३८३२४ अवजड वाहने आहेत.[२०]

पुणे जिल्ह्या संबंधीच्या वरील माहिती वरून असे असे लक्षात येते की, जिल्ह्याला मिळालेल्या भौगोलिक सिमा, हवामान, मृदा, नद्या, नैसर्गिक साधन संपत्ती, स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या अभ्यासावरून असे म्हणता येते की, पुणे जिल्हा हा एक विकसित व पुढारलेला जिल्हा आहे असे लक्षात येते.

## ब) सहकारी चळवळ :

सदर विभागात सहकारी चळवळ संबंधीची महिती दिली आहे. त्यामध्ये प्रामुख्याने सहकाराचा अर्थ, व्याख्या, सहकारी चळवळीचा जागतिक पातळीवरील उदय, विकास व वाटचाल तसेच पुणे जिल्ह्यातील सहकारी चळवळ, सहकारा पुढील आवाहने अशा विविध घटकांचा सविस्तर अभ्यास या विभागात केला आहे.

### ३.१४ सहकाराचा अर्थ व व्याख्या :

सहकार (Co-operation) हा शब्द लॅटिन भाषेतील को-ऑपररी (Co-operari) या शब्दापासून निर्माण झाला आहे. (Co) को याचा अर्थ सह आणि (operari) ऑपररी याचा अर्थ काम करणे असा आहे. दोन्ही शब्दांचा एकत्रितपणे विचार केल्यास एकत्रितपणे काम करणे अथवा सहकार्याने काम करणे असा त्याचा अर्थ होतो. सहकाराचा शब्दश: अर्थ परस्पर सहाय्य करणे किंवा सर्वांच्या हितासाठी एकत्रितपणे काम करणे असा होतो. सहकार ही मानवी सहजीवनाच्या कल्पनेची एक व्यवस्था होय की ज्यामध्ये आर्थिक आणि सामाजिक विकासासाठी एकत्र येण्याची इच्छा मानवात प्रखरपणे निर्माण होते.[२१] थोडक्यात सहकार ही लोकशाही, चारित्र्य, बंधुभाव, शांतता आणि प्रगती या अधिष्ठानावर आधारलेली अशी एक आदर्श समाजव्यवस्था होय की, जिच्यामध्ये समान निष्ठा असणारे लोक आपल्या कल्याणासाठी एकत्र येत असतात व आपल्या समस्या सोडवतात असा अर्थ घेतला जातो.[२२]

सहकाराचा वरील अर्थ लक्षात आल्यानंतर सहकाराच्या काही विचारवंतानी निश्चित अर्थ लक्षात येण्यासाठी काही व्याख्या सांगितल्या आहेत, यापैकी काही व्याख्या पुढीलप्रमाणे :

१. **हेरिक :**

'सहकार म्हणजे ऐच्छिकरित्या गरीब व्यक्तींनी एकत्र येऊन एकमेकांचे भांडवल व साधनसामग्री फायदेशीररित्या परस्पर सामंजस्याने वापरण्याची कृती होय.'[२३]

२. **श्री. वैकुंठलाल मेहता :**

'समान आर्थिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी समान गरजा असणाऱ्या व्यक्तींनी ऐच्छिकरित्या एकत्र येऊन स्थापन केलेली संघटना म्हणजे सहकार होय.'[२४]

३. **एड्वर्ड मॅक्लॅगन समिती १९१४ :**

'सहकार तत्त्वज्ञान असे आहे की, एकाकी, दुर्बल, व्यक्तीला इतरांशी सहकार्य करून परस्पर सहाय्यांच्या व नैतिक विकासाच्या आधारे सधन व सबळ व्यक्तींना उपलब्ध असलेले भौतिक लाभ स्वत:साठी मिळवता येऊ शकतात आणि व्यक्तीच्या नैसर्गिक क्षमतेचा विकास साधतात.'[२५]

४. **एम. डार्लिग :**

'सहकार ही एक पद्धती आहे. यापेक्षा त्यात अधिक काही तरी आहे, हृदय व मनाला आवाहन करणारे ते चैतन्य आहे. तो धंद्यात अनुसरलेला धर्मच आहे. स्वंयपूर्णता व सेवा यांचे ते आचरण तत्त्व आहे.'[२६]

## ३.१५ सहकाराची वैशिष्ट्ये :

### १. सहकार ही एक संघटना :

व्यक्तीच्या स्वत:च्या गरजा सामूहिकपणे भागविता याव्यात यासाठी निर्माण केलेली संघटना म्हणजे सहकार होय. समान आर्थिक व सामाजिक उद्दिष्टे भागविण्यासाठी व्यक्ती आणि संस्था एकत्र येऊन संघटना स्थापन करतात.

### २. लोकांना सेवा देणे हा प्रमुख हेतू :

आपल्या सभासदांची आणि समाजाची सेवा करणे हे सहकारी संस्थेचे प्रमुख उद्दिष्ट असते. खासगी संस्थांप्रमाणे केवळ नफा मिळविणे हा हेतू नसून सामाजिक कल्याण साधणे हे मुख्य उद्दिष्ट असते.

**३. उत्पन्न आणि संपत्तीचे समान वितरण :**

सभासदांमध्ये उत्पन्न आणि संपत्तीचे समान वाटप करणे हे सहकाराचे मुख्य उद्दिष्ट आहे. सहकारी संस्था जे व्यवसाय करतात त्या व्यवसायच्या यशस्वीतेचे फळ म्हणून संपत्ती आणि उत्पन्नाच्या रूपाने फायदा झाला पाहिजे. यासाठी प्रयत्न केले जात असतात.

**४. मक्तेदारीवर निर्बंध :**

जेथे सहकारी संस्थांचे अस्तित्त्व असते तेथे मक्तेदारीला आपोआपच आळा बसतो. बऱ्याचशा देशात बहुराष्ट्रीय महामंडळे आपल्या काही उत्पादनात मक्तेदारी निर्माण करतात. परंतु अशा क्षेत्रात सहकारी संस्थाचे आगमन झाल्यास मक्तेदारीवर निर्बंध येतात आणि त्याचा लाभ समाजाला होतो.

**५. आर्थिक व सामाजिक परिवर्तनाचे साधन :**

जगातील भांडवलशाही, समाजवादी आणि साम्यवादी देशातून सहकार चळवळीने दुर्बल आणि आर्थिक व सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या समाजात परिवर्तन घडवून आणले आहे. म्हणून ही एक प्रकारची सामाजिक व आर्थिक चळवळ आहे.

**६. समानतेची वागणूक :**

सहकारामध्ये सर्व सभासद व्यक्ती आणि संस्थांना समान अधिकार दिलेले असतात. त्यात गरीब-श्रीमंत, उच्च-नीच, जात-पात असा भेद केला नाही. सर्वांना समानतेची वागणूक मिळते.

**७. बाह्य शक्तींचा हस्तक्षेप नसतो :**

सहकारी संस्थेचे सभासद आपल्या संस्थेचा कारभार निवडून दिलेल्या संचालकांमार्फत करीत असतात. त्यांच्या कारभारात बाह्य शक्तींना हस्तक्षेप करण्यास वाव नसतो.

**८. एकाकरिता सर्व आणि सर्वांकरिता एक :**

हे सुप्रसिद्ध तत्त्व सहकारी संस्थांचा पाया आहे. त्याचबरोबर सभासदांमध्ये बंधुत्त्व, स्वयंसेवा आणि स्वावलंबनाची शिकवण दिली जाते. यामुळे सभासदांमध्ये एकता, समानता आणि बंधुत्वाची भावना जोपासली जाते. सहकारी संस्थांमधील सभासद एकमेकांच्या व्यवहारांची देखरेख करताना समतेने व शिस्तीने वागतात. यावरून सहकाराचे नैतिक मर्म लक्षात येते.

**९. नैतिक मूल्य :**

महात्मा गांधींच्या मतानुसार सहकारी संस्थांना नैतिक मूल्यांचा आधार असणे आवश्यक आहे.[२७]

### ३.१६ सहकाराचे स्वरूप :

सहकाराच्या विभिन्न व्याख्यांवरून सहकाराचे स्वरूप अगदी स्पष्ट होते. सहकाराची विविध वैशिष्ट्ये विचारात घेतल्यास, सहकाराचे नेमके स्वरूप कळण्यास मदत होते. सहकाराच्या व्याख्या व त्याची वैशिष्ट्ये आधारभूत समजून सहकाराचे विविधअंगी स्वरूप पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

### ३.१६.१ आर्थिक स्वरूप :

सहकार हे राष्ट्रीय अर्थव्यवस्थेच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे अंग आहे. लोकांच्या आर्थिक विकासाचे ते एक माध्यम म्हणून ओळखले जाते. सहकाराचे आर्थिक स्वरूप: १. एक अर्थपद्धती २. एक क्षेत्र आणि ३. एक चळवळ असे तिहेरी आढळतात. ज्याप्रमाणे भांडवलशाही साम्यवाद व समाजवाद ह्या अर्थपद्धती आहेत. त्याचप्रमाणे सहकार ही सुद्धा एक अर्थपद्धती आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये खाजगी क्षेत्र, सार्वजनिक क्षेत्र व मिश्र क्षेत्र अशी क्षेत्रे आढळतात.[२८] तसेच सहकार क्षेत्र चौथे महत्त्वाचे क्षेत्र होय. भारतामध्ये तर राष्ट्रीय अर्थव्यवस्थेत सहकार क्षेत्राचा मोठा वाटा आहे. भारतातील साखर उद्योग हा सहकार क्षेत्राच्या ताब्यात आहे. भारताच्या ग्रामीण भागातील कर्जपुरवठा सुद्धा सहकारी क्षेत्राच्या हातात आहे. अनेक अन्य व्यवसाय उद्योग सहकारी क्षेत्रामध्ये आहेत. यावरून सहकाराचे आर्थिक स्वरूप स्पष्ट होते. भारतामध्ये तर सहकार ही एक आर्थिक चळवळ बनली आहे. भारत हा ग्रामीण भागात वसला आहे आणि या ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी सहकाराची चळवळ राबविली जात आहे. म्हणून सहकाराची एक अर्थव्यवस्था, एक क्षेत्र व एक चळवळ ही तीन रूपे महत्त्वाची आहेत.

### ३.१६.२ सामाजिक स्वरूप :

समाजाच्या उन्नतीचे माध्यम म्हणूनही सहकाराचे हे सामाजिक स्वरूप लक्षात घेतले पाहिजे. वास्तविक काही सहकार तज्ज्ञांच्या मते सहकार ही आर्थिक चळवळ नसून ती एक सामाजिक चळवळ आहे. कारण सहकार हे मुळात सामाजिक गरजेतून उदयास आले आहे. म्हणून समाजाच्या प्रबोधनाचे व विकासाचे कार्य सहकारामुळे गतिमान झाले आहे. समाजाच्या परिवर्तनाची प्रक्रिया सहकारामुळे सुरू झाली आहे. सहकारामध्ये धर्म, पंथ, जात, वर्ग, लिंग हे सर्व भेद बाजूला सारून सर्व सभासदांना समपातळीवर वागणूक दिली जाते.[२९] सर्वांना एकसारखे समजले जाते. त्यामुळे सामाजिक विषमता व स्पृश्यास्पृश्यता कमी होण्यास मदत झाली आहे. लोकशाही कारभारामुळे सर्वांना व्यवस्थापनात सहभागी होण्याची समान संधी प्राप्त होते.

समाजातील दुर्बल घटकांना सहकारामुळे संरक्षण मिळाले आहे. समाजातील सर्व भेद विसरून लोक एकत्र आल्याने समाजात एक संघता व सामंजस्य निर्माण झाले आहे. सामाजिक सलोखा वाढला आहे. म्हणून सहकार ही समाजाची एक जीवनपद्धती बनली असल्याचे दिसून येते. त्यातून समाजाच्या सांस्कृतिक विकासासाठी पोषक वातावरण तयार होण्यास मदत झाली आहे.

**३.१६.३ शैक्षणिक स्वरूप :**

सहकाराला आज शैक्षणिक प्रसाराचे प्रभावी साधन समजले जाते. विशेषत: ग्रामीण भागातील शेतकरी, मजूर, आदिवासी, लहान कारागीर, दुर्बल घटक, महिला ह्या सर्वांच्या दृष्टीने सहकार हे शैक्षणिक प्रसाराचे साधन आहे. आहे. सहकारी संस्थांमुळे शिक्षणाचे व साक्षरतेचे प्रमाण वाढले आहे. सहकाराच्या विस्तारामुळे प्रौढ शिक्षणालासुद्धा चालना मिळाली आहे.[३०] तिथे शिक्षणाचा प्रसार झाला आहे. साक्षर होणे, शिक्षण घेणे ही महत्त्वाची जाणीव निर्माण करण्याचे श्रेय सहकारी चळवळीला दिले जाते. सहकाराला शैक्षणिक स्वरूप आहे.

**३.१६.४ वैचारिक स्वरूप :**

सहकारास वैचारिक स्वरूप आहे. सहकार क्षेत्रातील तज्ज्ञांच्या व विचारवंतांच्या मते सहकाराला वैचारिक अधिष्ठान आहे. त्याआधारे सहकार ही एक विचारप्रणाली समजली जाते. त्या विचारप्रणालीची खास अशी वैशिष्ट्ये व तत्त्वे आहेत.[३१] ज्याप्रमाणे भांडवलशाही विचारप्रणाली आढळते. त्याप्रमाणे सहकाररित्या ही स्वतंत्र व नवी विचारप्रणाली आहे. एकता, समानता, लोकशाही, स्वातंत्र्य, स्वावलंबन, परस्पर-साहाय्य, आदी तत्त्वांवर आधारीत अशी ही सहकाराची विचारसरणी जगातील बहुसंख्य देशांमध्ये मान्यता पावली आहे. भांडवलशाही विचाराला प्रत्युत्तर म्हणून सहकाराचा विचार मांडला जातो.

सहकार हे नवे तत्त्वज्ञान आहे असेही त्याचे एक स्वरूप आढळते. तत्त्वज्ञान हे काल्पनिक असले तरी सहकाराच्या बाबतीत ते व्यावहारिक पातळीवर मूर्त स्वरूपात आढळते. सहकाराचे तत्त्वज्ञान संस्थात्मक स्वरूपात व अर्थपद्धतीच्या स्वरूपात आज सर्वत्र दिसू लागले आहे. सहकाराचे तत्त्वज्ञान ग्रामीण भागातील खेडूतांपर्यंत, डोंगराळ भागातील आदिवासींपर्यंत व शहरातील नागरी लोकांपर्यंत पोहोचले आहे.

**३.१६.५ संघटनात्मक स्वरूप :**

सहकार हा एक संघटन प्रकार म्हणून ओळखला जातो. सहकारी संस्था हे त्याचे स्वरूप आहे. व्यापार-उद्योग करण्यासाठी एकल व्यापारी संस्था, भागीदारी संस्था, संयुक्त भांडवली

कंपनी, सहकारी संस्था व सार्वजनिक उपक्रम असे पाच संघटन प्रकार आहेत. तेव्हा व्यापार, उद्योग, सेवा उद्योग करण्यासाठी सहकारी संस्था स्थापन केल्या जातात. त्यामध्ये पतपुरवठा सहकारी संस्था, सहकारी बँका, ग्राहक सहकारी संस्था, खरेदी-विक्री सहकारी संघ, सहकारी साखर कारखाने, सहकारी सुतगिरण्या, सहकारी वाहतूक संस्था, सहकारी मजूर संस्था, दुग्ध व्यवसाय सहकारी संस्था, पीक संरक्षण, सहकारी संस्था, गृहनिर्माण सहकारी संस्था, पाणीपुरवठा सहकारी संस्था, कृषी विपणन सहकारी संस्था, बलुतेदार सहकारी संस्था आदी संघटनात्मक प्रकारांमध्ये सहकाराचे स्वरूप आढळते.[३२]

सहकाराचे हे संघटनात्मक स्वरूप व्यक्तीचे संघटन, ऐच्छिक संघटन, लोकशाही संघटन व उद्योगकर्त्यांचे संघटन अशा प्रकारेसुद्धा दिसून येते. समान उद्दिष्ट व समान गरजा यांच्या पूर्ततेसाठी स्वेच्छेने एकत्रित येऊन लोकशाही पद्धतीने सहकारी संस्था चालविल्या जातात. ह्या संघटनात्मक स्वरूपावरून सहकाराची ओळख होते. म्हणून हे स्वरूप सर्वात महत्त्वाचे आहे.

### ३.१७ सहकाराची व्याप्ती :

सहकाराची व्याख्या, वैशिष्ट्ये व स्वरूप यावरून सहकाराची व्याप्तीसुद्धा स्पष्ट होते. पण सहकाराची व्याप्ती समजून घेण्यासाठी तो कोणकोणत्या क्षेत्रात पसरला आहे हे पहाणे उचित होईल. वास्तविक समाजाच्या सामाजिक-आर्थिक क्षेत्रांतील प्रत्येक अंग व्यापले आहे. भारतातील महाराष्ट्रासारख्या राज्यामध्ये तर 'सहकार कुठे नाही?' हा प्रश्न पडतो. म्हणून सहकाराची व्याप्ती पुढीलप्रमाणे सांगता येईल.

#### १. कृषी क्षेत्र :

सहकाराचा सर्वात जास्त विस्तार कृषी क्षेत्रात झाला आहे. भारतातसुद्धा सहकाराने कृषी क्षेत्र सर्वात जास्त व्यापले आहे. शेतीसाठी पीक-कर्ज, मध्यम व दीर्घ मुदतीचे कर्ज, बी-बियाणे, खते, कीटकनाशके, पाणीपुरवठा, शेतमाल वाहतूक, आदींची सुविधा पुरविण्यासाठी विभिन्न प्रकारच्या सहकारी संस्था स्थापन झालेल्या आहेत. म्हणून भारतात तर कृषी क्षेत्राच्या विकासासाठी सहकार वरदान ठरले आहे.

#### २. उत्पादन प्रक्रिया क्षेत्र :

कृषी मालावर आधारित उत्पादन व प्रक्रिया करण्यासाठी अनेक सहकारी संस्था स्थापन झालेल्या आहेत. साखर उत्पादनासाठी तर भारतातील सहकारी क्षेत्र जगात प्रसिद्ध आहे.

सूतगिरण्या, तेलगिरण्या, दुधप्रक्रिया संस्था, खत कारखाने, कीटकनाशके निर्मिती, शेती उपयोगी साधने, सहकारी शेती, भात गिरण्या, आदींबाबतीत असंख्य सहकारी संस्था स्थापन झालेल्या दिसून येतात.

**३. लघुउद्योग क्षेत्र :**

ग्रामीण उद्योग व लघुउद्योग क्षेत्रातसुद्धा सहकारी संस्था स्थापन झालेल्या आहेत. कर्जपुरवठा करण्याबाबतसुद्धा सहकारी बँका व नागरी सहकारी बँका ग्रामीण व लघुउद्योगांना सवलती देतात.

**४. बँकिंग क्षेत्र :**

ग्रामीण भागात जिल्हा सहकारी बँकांमार्फत व शहरी भागात नागरी सहकारी बँकांमार्फत 'सहकार' बँकिंग क्षेत्रात कार्य करताना दिसते. विशेषत: बँकिंग क्षेत्र सहकाराने काबीज केलेले आहे. मोठमोठ्या शहरामध्ये नागरी सहकारी बँका व्यापक प्रमाणावर कार्य करीत आहेत.

**५. ग्राहक क्षेत्र :**

ग्राहकांना गृहपयोगी व जीवनाश्यक प्रकारच्या वस्तू पुरविण्यासाठी ग्राहक सहकारी भांडारे व संस्था कार्य करताना दिसून येतात. शेती अवजारे, पेट्रोल, डिझेल इत्यादी विकण्यासाठी सहकारी संस्था स्थापन झालेल्या आहेत.

**६. सेवा क्षेत्र :**

विविध प्रकारच्या सेवा देण्यासाठीसुद्धा सहकार संस्था स्थापन झालेल्या आहेत. त्यामध्ये पीक संरक्षण, पाणीपुरवठा, साठवणूक, कृषीमाल, खरेदी विक्री, बँकिंग इत्यादी क्षेत्रांतील सहकारी संस्थांचा समावेश होतो.

**७. नागरी क्षेत्र :**

सहकाराने काही बाबतीत नागरी क्षेत्र बरेच व्यापले आहे. विशेषत: गृहनिर्माण, गृहतारण, सदनिका मालक, सहकारी संस्था, पगारदारांच्या पतसंस्था, नागरी पतसंस्था इत्यादी प्रकारच्या सहकारी संस्था स्थापन झालेल्या आहेत.

**८. सहकार शिक्षण :**

सहकाराचे शिक्षण व प्रशिक्षण देण्यासाठी राष्ट्रीय पातळीवर व राज्य पातळीवर संस्था/प्रशिक्षण केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. केंद्र सरकारने पुणे येथे वैकुंठ मेहता सहकारी

व्यवस्थापन संस्था स्थापन केली आहे. तर महाराष्ट्रात सहकाराचे प्रशिक्षण देणारी दोन महाविद्यालये व तेरा प्रशिक्षण केंद्रे आहेत. सहकार खात्यामार्फत ती चालविली जातात.

**९. अन्य क्षेत्रे :**

चित्रपट निर्मिती, पुस्तक प्रकाशन, सहकारी मुद्रण, सहकारी इस्पितळे, सहकारी वनीकरण, औद्योगिक संस्था, मत्स्यपालन, कुक्कुटपालन, औद्योगिक वसाहती, मजूर संस्था या क्षेत्रांमध्येसुद्धा सहकारी संस्था स्थापन झालेल्या आहेत.

सहकाराच्या व्याप्तीबाबत ग्रामीण क्षेत्र, नागरी क्षेत्र, कृषी क्षेत्र व बिगर कृषी क्षेत्र, पतसंस्था व बिगर पतसंस्था, व्यापार क्षेत्र व उत्पादन क्षेत्र, व्यवसाय क्षेत्र व सेवा क्षेत्र अशाप्रकारे सुद्धा विभाजन केले जाते.[३३]

## ३.१८ जागतिक सहकारी चळवळीचा उगम व उदय:

जागतिक सहकारी चळवळीचा उगम पाहताना इंग्लंड हे चळवळीचे जन्म स्थान आहे. १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात औद्योगिक क्रांतीच्या परिणामामुळे इंग्लंडमध्ये सामाजिक, राजकीय व आर्थिक क्षेत्रात आमूलाग्र बदल झाला. औद्योगिक क्रांतीमुळे इंग्लंडमधील लोकांचे संपूर्ण आर्थिक व सामाजिक जीवन बदलले. ग्रामीण भागातील लोक शहराकडे येऊ लागले. रोजगारासाठी मोठ्या प्रमाणावर लोक बाहेर पडू लागले.[३४] नवीन–नवीन कारखाने निर्माण होऊ लागले. अनेक लोक काम करण्यासाठी कारखान्यात जावू लागले. त्यामुळे कामगार वर्ग व कारखानदार मालक वर्ग निर्माण होऊन या बदलामुळे अनेक समस्या निर्माण झाल्या. कामगारांना कमी वेतन, वाढत जाणारी बेकारी, बालकामगारांचे शोषण इत्यादी. कामगारांच्या वाढत्या समस्या निर्माण झाल्या. त्यातून कामगार संघटना असावी त्यांनी कामगाराचे प्रश्न सोडवावेत अशा प्रकारचा एक विचार समाजातून पुढे आला.

इंग्लंडमध्ये या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी काही सुधारक पुढे आले. ज्यांना मालक व मजूर यांच्यातील संबंधाचा विचार करून उदार धोरण स्वीकारावे असे वाटत होते. त्यात रॉबर्ट ओवेन यांचा समावेश केला जातो. ओवेनला ‘‘सहकाराचा पिता’’ असे म्हणतात.[३५]

ओवेनने सहकाराच्या तत्त्वांचा प्रसार केला ही चळवळ समाजात रूजविण्याचा प्रयत्न केला. सामाजिक व आर्थिक सुधारणेसाठी त्यांची धडपड होती. सन १८४३ मध्ये ओवेनच्या विचारसरणीचे २८ विचारवंत (विणकर) एकत्र आले व त्यांनी वर्षाला एक पौंड बचत करून २८

पौंड जमा केले व १८४४ मध्ये ''रॉश्डेल इक्किटेबल पायोनियर्स'' नावाची सोसायटी स्थापन केली.[३६]

सहकारी संस्थांची स्थापनेमध्ये व विकासामध्ये शासनाची अत्यंत महत्त्वाची भूमिका राहिलेली आहे.

### ३.१९ भारतातील सहकार चळवळ प्रारंभ व विकास :

एकोणिसाव्या शतकात भारतातील शेतकरी सावकारी पाशात अडकले होते. शेतकऱ्यांसवर असणारे सावकारांचे कर्ज दिवसेनदिवस अधिक वेगाने वाढत होते भाडवलशाही अर्थव्यवस्थेत श्रमिकांचे दिवसेनदिवस वाढत्या प्रमाणात आणि प्रचंड शोषन होत होते. त्यामुळे एका बाजुला भाडवल दारांची श्रीमंती वाढत असतांना दुसऱ्या बाजुला संख्येने अधिक असूनही श्रमिक निर्धन होत चालला होता. समाजात दोन वर्ग निर्मान होऊन आर्थिक विषमतेची दरी दिवसेनदिवस अधिकाअधिक ऋद्रावत चालली होती.[३७]

श्रमिकांचे शोषन कमा होण्यासाठी कार्लमार्क्स या साम्यवादी अर्थशास्त्रज्ञाने जगातील कामगारांना 'कामगारांनो तुम्ही एकत्र या त्यामूळे तुमचे कोणतेही नुकसान होणार नाही परंतू आर्थिक शोषणाच्या बेड्या मात्र गळून पडतील' असे आवाहण केले होते.[३८] इस १७६० ते १८३० या कालखंडात इग्लंड या देशात औद्योगीक क्रांती झाली त्यामूळे रॉबर्ट ओवेन यांनी कामगारांना स्वस्त दराने वस्तू उपलब्ध करून देऊन सहकारी तत्त्वावर वस्तू भांडारे सुरू केली त्यामुळे सहकारी चळवळीचा जनक म्हणुन रॉबर्ट ओवेन यांना संबोधले गेल. इस १८४३ मध्ये रॉशडेल यांनी २८ विणकर कामगारांची रॉशडेल पायोनियर सोसायटी यानावाने ग्राहक भांडार सुरू केले. इस १९६२ पर्यंत रॉशडेल पायोनियर सोसायटीची ३०००० किरकोळ विक्रीची सहकारी दुकाने सुरू करण्यात आली होती.[३९] सहकारी चळवळीचे उगमस्थान इग्लंड हा देश आहे असे मानले जाते.

#### ३.१९.१ स्वातंत्र्यपूर्व काळातील सहकारी चळवळी :

इ. स. १८८३ चा भूमी सुधारणा कायदा आणि १८८४ कृषी कर्जे कायदा शेतकऱ्यांचे कर्ज फेडण्यासाठी फारच कमी पडत असल्याने १९०४ चा सहकारी कायदा करण्यात आला. डॅनियल आणि शुल्झ यांनी या कायद्यास आर्थिक व सामाजिक इतिहासातील वळण बिंदू असे त्याचे वर्णन केले आहे.[४०] सन १९१२ च्या कायद्याने जुन्या कायद्यामधील तुटी दूर केल्या यासाठी ५ टप्प्या मध्ये सहकार स्वातंत्र्यपूर्व चळवळीत विकसित होत गेला आणि १९३५ मध्ये रिझर्व बँकेने कृषी

पतपुरवठा विभागाची स्थापना केली. तर १९४४ मध्ये डॉ. डी. आर. गाडगीळ व १९४७ मध्ये श्री. आर. जी. सोमय्या यांच्या अध्यक्षतेखाली समित्या स्थापन करण्यात आल्या. त्यामुळे संथ गतीने का होईना शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा कमी होत गेला.[४१] म्हणजेच देशात सहकारी चळवळीने स्वातंत्र्यपूर्व काळातच आपला पाया मजबूत केला होता असे म्हणात येईल.

### ३.१९.२ स्वातंत्रोत्तर काळातील सहकारी चळवळ :

स्वातंत्र्योत्तर काळात भारताच्या पंचवार्षिक योजनांमध्ये सहकाराच्या विकासाला अनन्य साधारण महत्त्व देण्यात आहे. सहकाराचा नियोजन बध्द विकास करण्यासाठी विविध पंचवार्षिक योजना सुरू करण्यात करण्यात आल्या. ११ पचंवार्षिक योजना आणि ३ वार्षिक योजनांचा यामध्ये समावेश होतो. सध्या १२ पंचवार्षिक योजना सुरू आहे.[४२] अलिकडील दोन पंचवार्षिक योजनांची वैशिष्ट्ये म्हणजे ग्रामिण भागात व्यापक रोजगार, सहकारी बँकावर रिझर्व्ह बँकेचे नियंत्रण, राजकिय प्रभाव सहकारी संस्थामध्ये कमी करणे, सहकारी संस्था आत्मनिर्भर करणे, सहकारी विपणन अधिक व्यापक आणि सक्षम करणे, सहकारी बँकाचे सक्षम बँकेत विलीनिकरण करणे अशा स्वरूपाचे आहे. देशातील सहकारी चळवळीला सन २००४ मध्ये १०० वर्षे पूर्ण झाली आहेत.[४३] देशातील सर्वागीण विकासात सहकारी चळवळीचा फार मोठा वाटा आहे असे म्हणता येते.

### ३.२० महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचा इतिहास :

भारतात महाराष्ट्र हे एक अग्रेसर राज्य आहे. महाराष्ट्र राज्याची निर्मिती १ मे १९६० रोजी झाली. महाराष्ट्र हा पूर्वीपासून कृषीप्रधान राज्य आहे. सहकार चळवळीमध्ये आवश्यक असणारे वातावरण महाराष्ट्र राज्यात होते.[४४] त्यामुळे देशात सहकाराचा पाया मजबूत करण्याचे कार्य महाराष्ट्र राज्याने केले.

भारतात १९०४ पासून सहकारी संस्था कायदा संमत झाल. १९१२ मध्ये सहकारी संस्था कायद्यात दुरुस्ती झाली. त्यामुळे पतपुरवठा क्षेत्राबरोबर अन्य क्षेत्रात सहकारी संस्थांचा विकास होऊ लागला. १९२५ मध्ये तत्कालीन मुंबई सरकारने सहकारी संस्थांसाठी कायदा संमत केला. प्रांतिक सरकारने राज्याची गरज लक्षात घेऊन सहकारी संस्था स्थापन करण्याचा विचार निर्माण झाला. तसेच १९३७ मध्ये प्रांतिक सरकारच्या मंत्रिमंडळांनी सहकार चळवळीचा विकास घडवून आणण्याच्या दृष्टीने अनेक प्रयत्न केले. १९४४ मध्ये नेमलेल्या संस्था समिती १९४६ मधील

गाडगीळ समिती आणि १९४८ मधील नेमलेली नानावटी समिती या सर्व समित्यांनी सहकारी क्षेत्राचा विकास करण्यासाठी उपयुक्त अशा सूचना केल्या.[४५]

महाराष्ट्र सहकारी चळवळीचा विकास घडवून आणण्यासाठी कै. वैकुंठलाल मेहता, कै. डॉ. धनंजय गाडगीळ, कै. पद्मश्री विखे पाटील, कै. आर. जी. सरैय्या, वामनराव वर्दे, डॉ. डी. जी. कर्वे यासारख्या नेतृत्व गुणी सहकार चळवळीचे नेतृत्व लाभले.[४६]

१९१२ मध्ये आर. एम. हिरेमठ व जी. ए. सहस्त्रबुद्धे यांनी सहकारी क्षेत्रात साखर कारखाना काढण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर १९४५ मध्ये अहमदनगर जिल्ह्यात प्रवरानगर आणि कै. पद्मश्री विखे पाटील यांच्या प्रयत्नातून साखर कारखाना सुरू केला. हा प्रयोग यशस्वी झाल्यानंतर महाराष्ट्राच्या इतर भागात पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर या भागात कारखानदारी अस्तित्त्वात आली. याकामी शेतकरी नेते सहकारी साखर कारखाना काढण्यासाठी प्रभावित झाले. त्यात कै. वसंतदादा पाटील, कै. शंकरराव मोहिते-पाटील, कै. आण्णासाहेब मगर, कै. मनीभाई देसाई, शंकरराव पाटील, शरदरावजी पवार, नाना नवले, आमदार अनंतराव थोपटे, नानासाहेब शितोळे, कै. निवृत्तीशेठ, शेरकर यांनी पुणे जिल्ह्यातील साखर कारखाना स्थापन करण्यात सिंहाचा वाटा उचललेला आहे.[४७]

याशिवाय ग्राहक भांडारे, सहकारी गृहनिर्माण संस्था, नागरी सहकारी बँका यांचीही प्रगती होत गेली.

### ३.२१ पुणे जिल्ह्यातील सहकार चळवळीचा इतिहास व उगम :

पुणे जिल्ह्यातील सहकार चळवळीला अखिल भारतीय स्तरावर विशेष महत्त्व आहे, याचे कारण असे की, याच पुणे जिल्ह्यात २ एप्रिल, १८७० या दिवशी वासुदेव गणेश जोशी उर्फ सार्वजनिक काका व त्यांचे इतर सहकारी या सर्वांनी मिळून सार्वजनिक सभेचे रोप महाराष्ट्राच्या भूमीत लावले त्याला खत पाणी घालण्याचे आरंभी कष्टाचे काम सार्वजनिक काकानेच केले, ''ऐक्य वर्धिनी'' व व्यापारोत्तेजक मंडळाची निर्मिती करून तिच्यामार्फत स्वदेशी वस्तुची दुकाने सार्वजनिक तत्त्वावर जागोजागी सुरू केली त्यांनी आपल्या घरी सहकारी तत्त्वावर देशी मागाचा एक कारखानाही काढला. इंग्रज सरकारचा न्याय महागडा म्हणून खेडोपाडी ''लवाद कोर्ट'' स्थापन करून न्यायनिवाडा व्हावा यासाठी सरकारकडे आग्रह धरला पंचायतीमार्फत तंटे सोडविण्याचा मार्ग

लोकप्रिय करण्यासाठी त्यांनी महाराष्ट्रभर दौरे काढून पुणे व नगर येथे लवाद मंडळे स्थापन केली.[४८]

न्या. म. गो. रानडे यांनी भारतात सहकारी पद्धतीची शेती विकसित व्हावी यासाठी स्वित्झलँडचे उदाहरण दिले तेथील शेतकरी आपल्या व्यवसायात परस्परांना सहकार्य करतात, त्यांना कमी व्याजात कर्ज उपलब्ध होते. स्वित्झलँड प्रमाणे भारतात भूविकास बँका व्हाव्यात जास्तीत जास्त आधुनिक तंत्राचा वापर व्हावा, आधुनिक पद्धतीची बि-बियाणे उपलब्ध करून शेतीचे उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढावे. याबाबत मार्गदर्शन व्हावे असे त्यांनी सुचविले.[४९]

न्या. रानडे यांनी इ.स. १८८३ साली पुरंदर तालुक्यात पहिली बँक सहकारी पद्धतीवर सुरू करण्याचा प्रयत्न केला. परंतु ब्रिटीश सरकारच्या विरोधामुळे तो प्रयत्न यशस्वी होऊ शकला नाही. इंग्रज सरकारने सरकारी तत्त्वाच्या मार्गाने बँकेची स्थापना करण्याचा त्यांच्या या पहिल्या प्रयत्नाला खिळ घातली. तसेच त्यावेळची एकूण परिस्थिती अशी होती की, शेतकरी मोठ्या प्रमाणात कर्ज बाजारी होता यातून काही तरी उपाय शोधणे आवश्यक होते असे सरकारलाही वाटत होते.

पुणे जिल्ह्यात सहकार चळवळीचे लोण खऱ्या अर्थाने १९०६ साली येऊन पोहचले. १८/१/१९०६ साली उपनिबंधक सहकारी संस्था, रजिस्ट्रार मुंबई यांच्याकडील नोंदणी क्र. १९ व २० अन्वये डिफेन्स अकौंट नंबर-१ व दि कॉसमॉस को. ऑप. अर्बन बँक लि. पुणे या दोन सहकारी संस्था स्थापन झाल्या होत्या. सन १९०८-०९ सालापर्यंत संपूर्ण पुणे जिल्ह्यात केवळ या दोनच संस्था रजिस्टर्ड होत्या. त्यांचे एकूण भागभांडवल रु. ५११३ इतके होते. या संस्थांच्या सभासदांची संख्या केवळ ४२ इतकी होती या पुढील काळात पुणे जिल्ह्यात सहकाराच्या चळवळीला चांगलीच चालना मिळाली.[५०] सन १९११ साली याच काळात मालभतर्फे बारामती, नोंदणी क्र. ३०५ व जारगडवाडी तालुका बारामती नोंदणी क्र. ३२१ अन्वये येथील सहकारी संस्था सन १९११ साली नोंदविण्यात आल्या तसेच बेलसर निर्ळंज विविध कार्यकारी सहकारी सोसायटी, बेलसर नोंदणी क्र. ६३१, दि. १८/८/१९१३ या दिवशी नोंदवण्यात आली. त्यानंतर ३०/१०/१९१६ साली नोंदणी क्र. १२२२/७ अन्वये केडगाव विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था नोंदणी करण्यात आली. त्यानंतर नोंदणी क्र. १७८३, दि. २७/३/१९१८ अन्वये श्री सिद्धेश्वर विकास सोसायटी लि. खेड व नोंदणी क्र. १९४२ दि. ३ जून, १९२४ या दिवशी खेड तालुका डेव्हलपमेंट बोर्ड, खेड या संस्थेची स्थापना झाली. निरा कॅनॉल सोसायट्याचा सहकारी खरेदी विक्री संघ हा नोंदणी क्र. ५६५०, दि. २०/१०/१९२६ या दिवशी नोंदविण्यात आला.[५१]

खऱ्या अर्थाने १९१७ साली पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेची स्थापना झाल्यामुळे पुणे जिल्ह्यात सहकारी चळवळीला चांगलीच चालना मिळाली. त्यामुळे पुढील काळात अनेक सहकारी संस्था अस्तित्त्वात येऊन सहकारी चळवळीला गती प्राप्त झाली.[५२] पुणे जिल्ह्यातील सहकारी चळवळीला गती प्राप्त करून देणाऱ्या संस्थांमध्ये पुणे जिल्हा सहकारी भूविकास बँक, पुणे जिल्हा सहकारी बोर्ड, खेड तालुका डेव्हलपमेंट बोर्ड, निरा कॅनॉल्स सोसायट्यांचा सहकारी खरेदी विक्रीचा संघ, पुणे जिल्हा सहकारी खरेदी विक्री संघ, पुणे जिल्हा दूध उत्पादक संघ या सहकारी संस्थांचा प्रामुख्याने हातभार लागलेला आहे.

भारताचा व विशेषत: त्यावेळच्या मुंबई प्रांताच्या इतर विभागासाठी सहकारी चळवळीप्रमाणे पुणे जिल्ह्यातील सहकारी चळवळीची प्रगती चालू होती. निरनिराळ्या काळात आलेल्या कायद्यामुळे व सरकारच्या प्रयत्नामुळे कधी तिची प्रगती थोडीशी वेगाने झाल्यासारखे दिसते. तर कधी आर्थिक मंदी सारख्या कारणाने ती थांबल्यासारखी वाटते. थोड्या बहुत फरकाने ही स्थिती ब्रिटीश राजवटीच्या अंतापर्यंत चालू होती. ''सन १९४६ साली पुणे जिल्ह्यातील सर्व सहकार संस्थांची संख्या ४०४, सभासद संख्या ६४१८९ व खेळते भांडवल रु. २३६१९००३ इतके होते.''[५३]

अशा रितीने सहकारी चळवळ चाचपडत मार्ग काढीत असतानाच भारतात स्वातंत्र्य सूर्यांचा उदय झाला. भारतीय जनतेला प्रगतीच्या सर्व वाटा स्पष्ट दिसू लागल्या. यानंतर भारतातील सहकारी चळवळीला अभूतपूर्व चालना मिळाली. समाज परिवर्तनाचे एक प्रभावी साधन म्हणून तिला राजमान्यता व लोकमान्यता प्राप्त झाली. भारताच्या घटनेत सहकारी मार्गांचा उल्लेख करण्यात आला असून सहकारी समाज निर्माण करण्याचा प्रयत्न सध्याचे सरकार प्रस्थापित करीत आहे. सहकारी चळवळ वेगाने वाढत जाऊन ती समाजाच्या सर्व आर्थिक व सामाजिक अंगाला स्पर्श करीत तसेच समन्वयावर आधारलेली एक लोकशाही रचना अस्तित्त्वात येऊ शकेल असा भरवसा निर्माण होत आहे. पुणे जिल्ह्यातील सहकारी चळवळीने स्वातंत्र्यप्राप्तीनंतर केलेल्या प्रचंड प्रगतीचे श्रेय पुणे जिल्ह्यातील सहकारी चळवळीच्या अग्रणी असलेले तात्यासाहेब केळकर, डॉ. धनंजयराव गाडगीळ, डी. जी. कर्वे, अण्णासाहेब मगर, मामासाहेब मोहोळ, मुकूटराव काकडे, साहेबराव सातकर, आप्पासाहेब पवार, राजाभाऊ कुसाळकर, शिवाजीराव कोंडे देशमुख, शिवाजीराव भोसले, शरद पवार, आदि सामाजिक राजकीय व सहकारातील नेतृत्त्व सहकाराच्या माध्यमातून पुणे जिल्ह्याचा सर्वांगीण विकास घडवून आणण्याच्या दृष्टीने कार्यरत आहेत.

पुणे जिल्ह्यातील सहकारी चळवळ ही खऱ्या अर्थाने १९६० सालानंतर लोकभिमुख चळवळ बनली. आहे. १९६० सालानंतर पुणे जिल्ह्याच्या वाडी वस्तीपर्यंत सहकाराचे लोण पोहचविण्यासाठी सहकारातील कार्यकर्ते सतत प्रयत्नशील आहेत. आज पुणे जिल्ह्याच्या खेड्या-खेड्यातून सहकार चळवळीचे लोण पोहोचले आहे. पुणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागात बारा सहकारी साखर कारखाने, तीन सहकारी दूध संघ, २६५ सहकारी औद्योगिक संस्था, जिल्हा खरेदी विक्री संघ इ. सहकारी संस्थांच्या माध्यमातून पुणे जिल्ह्याचा सर्वांगीण विकास काही प्रमाणात घडून आलेला आहे व यापुढील काळात तो घडून येईल.

### ३.२२ सहकारी चळवळीमध्ये शासनाची भूमिका :

स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात शासनाची सहकार चळवळीच्या संदर्भातील भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. सरकारने स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळात सहकाराच्या संदर्भात विविध समित्या नियुक्त केलेल्या होत्या त्याचा आढावा घेऊन सहकार चळवळीत शासनाच्या भूमिकेचा विचार करणे अत्यंत आवश्यक आहे. कारण त्यावरून आपल्याला देशातील सहकारी चळवळी विषयीची पार्श्वभूमी व वाटचाल अधिक ठळकपणे लक्षात येते.

### ३.२२.१ स्वातंत्र्यपूर्व काळातील शासनाची भूमिका :

भारतीय सहकारी चळवळी बाबतची शासनाची भूमिका इंग्रज राजवटी पासूनच सुरू होते. कारण भारतात या चळवळीची खरी मुहर्तमेड व तिच्या विकासाच्या दृष्टीने इग्रजांनी अतिशय महत्त्वाची भूमिका निभावली आहे. तिच्या विकासासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण अशा विविध समित्या स्थापन केल्या होत्या. त्यासंबंधीची माहिती पुढील तक्ता क्रमांक ३.९ मध्ये दर्शवली आहे.

वरील तक्ता क्रमांक ३.९ वरून असे निदर्शनास येते की, भारतात स्वातंत्र्यपूर्व काळात राज्यकर्त्यांनी एकूण १४ समित्या स्थापन केल्या. त्यामध्ये प्रामुख्याने १८८२ विल्यम वेडरबर्न,१९०० एडवर्ड समिती, १९०४ चा सहकार कायदा, १९१२ चा दुसरा सहकार कायदा, १९१८ मॅक्लेगन समिती, १९२५ मुंबई सहकार कायदा, १९३५ चा रिझर्व्ह बँक इंडियाची स्थापना व कृषी पतपुरवठ्या विभागाची निर्मिती व १९४६ ची डॉ. गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखालील महत्त्वपूर्ण समित्या नेमल्या. त्यामूळे देशात स्वातंत्र्यपूर्व काळातच सहकारी चळवळीचा भक्कम पाया घातला गेला होता. तसेच समित्यांच्या शिफारशीमुळे सहकारी चळवळीची प्रगती व दिशा अतिशय योग्य पध्दतीने झाली होती असे म्हणता येते.

## तक्ता क्रमांक ३.९

## स्वातंत्र्यपूर्व काळात सरकारने स्थापन केलेल्या समित्या व कायदे

| वर्षे | प्रमुख | शिफारशी |
|---|---|---|
| १८८२ | विल्यम वेडरबर्न | सहकाराच्या विकासासाठी अवलंब करणाऱ्या शिफारशी |
| १८८२ | फेडरीक ब्रिटिश | मद्रास राज्यात सहकार तत्त्वावर बँक सुरू करताना निकलस येईल का? युरोप खंडातील सहकार चळवळीचा अभ्यास करणे. |
| १८९८ | डयपरनेकस अधिकारी | उत्तर प्रदेशात झशेश्रिश इरपज्ञ सुरू करण्याची शिफारस. |
| १९०० | एडवर्ड समिती | विविध क्षेत्रात सहकाराचा अवलंब करण्याबाबत. |
| १९०१ | दुष्काळ आयोग | विविध क्षेत्रात सहकाराचा अवलंब करण्याबाबत. |
| १९०४ | सरकार | १९०४ चा सहकार कायदा संमत.(पतसंस्थांच्या संदर्भात) |
| १९१२ | ब्रिटिश सरकार | सहकाराचा दुसरा कायदा मंजूर. (सर्व प्रकारच्या संस्था) |
| १९१८ | एडवर्ड मॅकलेगन समिती | सहकार कायद्याच्या विविध क्षेत्रावरील प्रभाव व शिफारशी. |
| १९१९ | चेम्सफर्ड/जेम्सफोर्ड | सहकार विषय प्रांताकडे सोपविण्याची शिफारस. |
| १९२५ | मुंबई सरकार | सहकाराचा व मुंबई राज्याचा प्रथम कायदा |
| १९३५ | सरकार | रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाची स्थापना आणि या बँकेने कृषीपतपुरवठा विभागाची निर्मिती. |
| १९४५ | आर. जी. सोमय्या | समिती सहकारी संस्थांचे नियोजनासंबंधी शिफारस. |
| १९४७ | नानावटी समिती | कूळ कर्ज योजना. |
| १९४६ | डॉ. गाडगीळ | खावटी कर्ज योजना. |

संदर्भ : सहकार, डॉ. गंगाधर कायदे पाटील, चैतन्य प्रकाशन, नाशिक पान नं. ७-२०.

### ३.२२.२ स्वातंत्र्योत्तर काळातील शासनाची भूमिका :

स्वातंत्र्योत्तर काळात सरकारची सहकाराच्या संदर्भात भूमिका अतिशय महत्त्वपूर्ण होती. भारताने समाजवादी अर्थव्यवस्था पुरस्कार करताना नियोजनाच्या माध्यमातून सहकार क्षेत्राकडे विशेष लक्ष पुरविले. सरकार आणि रिझर्व्ह बँकेने सावकाराचा ऋणग्रस्ततेतून शेतकऱ्यांना मुक्त करण्याच्या विविध प्रकारच्या सहकारी संस्थांची स्थापना करण्यावर भर दिला. तसेच देशाला पुरक व हितकारक अशी चळवळ उभी राहण्यासाठी सरकारने महत्त्वपूर्ण भूमिका निभावली आहे. त्यासंबंधीची माहिती पुढील तक्ता क्रमांक ३.१० मध्ये दर्शवली आहे.

वरील तक्ता क्रमांक ३.१० वरून असे निदर्शनास येते की, स्वाातंत्र्योनंतर भारत सरकारने सहकारी चळवळीच्या वाढीसाठी विविध समित्यांच्या माध्यमातून विकास घडवून आणला आहे. सरकारने स्वातंत्र्योत्तर काळात काही महत्त्वपूर्ण समित्या नेमल्या त्यामूळे प्रामुख्याने १९५४ ची ए.डी. गोरवाला, १९५४ ची राष्ट्रीय कृषी पुरवठा निधीची स्थापना, १९५९ ची वैकुंठभाई मेहता तर

## तक्ता क्रमांक ३.१०

## स्वातंत्र्योत्तर काळातील समित्या व कायदे

| अ. क्र. | वर्ष | प्रमुख | प्रमुख | शिफारशी |
|---|---|---|---|---|
| १. | १९५४ | रिझर्व्ह बँक | ए.डी. गोरवाला | ग्रामीण पतपुरवठा सर्वेक्षण |
| २. | फेब्रुवारी १९५४ | रिझर्व्ह बँक | -- | राष्ट्रीय कृषी पुरवठा निधीची स्थापना |
| ३. | सप्टेंबर १९५५ | सरकार | -- | राष्ट्रीय सहकार विकास आणि भांडार विभागाची स्थापना |
| ४. | जुलै १९५५ | सरकार | -- | इम्पीरीअल बँकेचे नाव बदलून स्टेट बँक ऑफ इंडिया ठेवले आणि ५ वर्षात ग्रामीण भागात ४०० नवीन शाखा निर्मितीचे उद्दिष्ट. |
| ५. | १९५८ | सरकार | -- | ग्रामीण विकासाची जबाबदारी |
| ६. | १९५९ | सरकार | वैकुंठभाई मेहता | सहकारी वित्तपुरवठा आणि ग्रामीण विकास |
| ७. | १९६२ | सरकार | वैकुंठभाई मेहता | सहकारी संस्थांचे प्रशासन |
| ८. | १९७८ | सरकार | शिवरामन | प्रादेशिक बँका |

**संदर्भ : सहकार, डॉ. गंगाधर कायदे पाटील, चैतन्य प्रकाशन, नाशिक पान नं. ७-२०.**

१९७८ ची शिवरामन समिती या प्रमुख समित्या नेमल्या होत्या. या समित्यांच्या शिफारशी शासनाने स्विकारून सहकारी चळवळ देशामध्ये अधिक जोमाने व सक्षम करण्याच्या दृष्टीने मोठे प्रयत्न केले आहेत असे दिसून येते.

### ३.२६ सारांश :

प्रस्तुत प्रकरणामध्ये सहकारी चळवळी संबंधी माहिती दिली आहे. जिल्ह्याची ऐतिहासिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व सामाजिक माहिती देण्यात आली. नैसर्गिक संपत्ती, हवामान, पर्जन्यमान, दळणवळण, पर्यटन, धार्मिक स्थळे इत्यादी संबंधी जिल्ह्याची ओळख करून देण्यात दिली आहे. जिल्ह्याची लोकसंख्या, प्रशासकिय रचना, स्थानिक स्वराज्य संस्था तसेच औद्योगिक विकास यासंबंधी विचार केला आहे. साखर कारखान्यांमुळे सभोवतालच्या परिस्थितीत घालेला आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक बदल यामुळे जिल्ह्याची प्रगती होत आहे. यावरून शेतकऱ्याच्या राहणीमानात व कौटुंबिक परिस्थितीमध्ये निश्चित बदल झाला. याच बरोबर जिल्ह्याची सर्वांगीण माहिती दिली.

तसेच या प्रकरणातील दुसऱ्या भागात सहकार चळवळी संबंधी अर्थ, उदय, उगम वैशिष्ट्ये, स्वरूप व व्याप्ती यांचा अभ्यास केला आहे. विकासासंबंधी जागतिक, देशातील व जिल्ह्यातील सहकारी चळवळीच्या प्रगती अभ्यासली आहे. तसेच सहकारी चळवळीच्या विकासासाठी स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील नेमलेल्या वेगवेगवेगळ्या समित्यांचा अभ्यास केला. त्यावरून भारतात सहकारी चळवळीच्या विकासात या समित्यांनी दिलेल्या शिफारशीचा मोठा वाटा आहे.

## * संदर्भ:

१. रसाळ राजेंद्र, भारतीय बँक व्यवसाय आणि सहकार, सक्सेस प्रकाशन, पुणे, पान क्रमाकं ५.१, ५.२.

२. दातीर आर. के., भारतीय बँक व्यवसाय आणि सहकार, निराली प्रकाशन, पुणे, पान क्रमाकं ५.७, ५.८.

३. पुणे जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २००७-०८, पान क्रमांक १.

४. तत्रैव, पान क्रमांक २, ३.

५. तत्रैव, पान क्रमांक २.

६. अर्थ व साख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, वांद्रे (पुर्व), मुबंई, पान क्रमांक ५१.

७. पुणे जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २००७-०८, पान क्रमांक २.

८. तत्रैव, पान क्रमांक ३.

९. तत्रैव, पान क्रमांक ३.

१०. तत्रैव, पान क्रमांक १.

११. तत्रैव, पान क्रमांक ११.

१२. महाराष्ट्रातील सहाकारी चळवळ एक दृष्टीक्षेप २००९, पान क्रमांक ३९, ४०.

१३. तत्रैव, पान क्रमांक ४०, ४१.

१४. पुणे जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २००७-०८, पान क्रमांक ७.

१५. तत्रैव, पान क्रमांक ८.

१६. तत्रैव, पान क्रमांक ८, ९.

१७. तत्रैव, पान क्रमांक ७.

१८. तत्रैव, पान क्रमांक ८.

१९. तत्रैव, पान क्रमांक ८, ९.

२०. तत्रैव, पान क्रमांक ८.

२१. तत्रैव, पान क्रमांक ९.

२२. तत्रैव, पान क्रमांक ९, १०.

२३. सहकार जगत, शुगर फेडरेशन मुंबई, ऊस विशेषांक, पान क्रमांक १७.

२४. तत्रैव, पान क्रमांक १७, १८.

२५. तत्रैव, पान क्रमांक १८.

२६. तत्रैव, पान क्रमांक १८, १९.

२७. तत्रैव, पान क्रमांक १९, २०.

२८. मल्याद्री व्ही., सहकारी साखर कारखान्यांचे आर्थिक व सामाजिक दुष्परिणाम, वाणिज्य पब्लीकेशन १९८०, पान क्रमांक २०.

२९. तत्रैव, पान क्रमांक १९, २०.

३०. तत्रैव, पान क्रमांक २०, २१.

३१. तत्रैव, पान क्रमांक २४.

३२. तत्रैव, पान क्रमांक २५.

३३. मुलूक पाडूरंग, सहकार चळवळीचा इतिहास, पान क्रमांक १२.

३४. दातीर आर. के., भारतीय बँक व्यवसाय आणि सहकार, निराली प्रकाशन, पुणे, पान क्रमाकं २.३, २.४.

३५. तत्रैव, पान क्रमांक २.४, २.५.

३६. तत्रैव, पान क्रमांक २.५, २.६.

३७. रसाळ राजेंद्र, भारतीय बँक व्यवसाय आणि सहकार, सक्सेस प्रकाशन, पुणे, पान क्रमाकं १.३.

३८. तत्रैव, पान क्रमांक १.६, १.७.

३९. तत्रैव, पान क्रमांक २.७, २.८.

४०. दातीर आर. के., भारतीय बँक व्यवसाय आणि सहकार, निराली प्रकाशन, पुणे, पान क्रमाकं १.६, १.७.

४१. तत्रैव, पान क्रमांक १.८, १.९.

४२. तत्रैव, पान क्रमांक २.१०.

४३. तत्रैव, पान क्रमांक २.१०, २.११.

४४. मुळूक पाडूरंग, सहकार चळवळीचा इतिहास, पान क्रमांक १२.

४५. रसाळ राजेंद्र, भारतीय बँक व्यवसाय आणि सहकार, सक्सेस प्रकाशन, पुणे, पान क्रमाकं ५.१, ५.२.

४६. तत्रैव, पान क्रमांक ५.२, ५.३.

४७. दातीर आर. के., भारतीय बँक व्यवसाय आणि सहकार, निराली प्रकाशन, पुणे, पान क्रमाकं ५.१०, ५.११.

४८. तत्रैव, पान क्रमांक ५.१२, ५.१३.

४९. तत्रैव, पान क्रमांक ६.२.

५०. तत्रैव, पान क्रमांक ६.६.

५१. मुलूक पाडूरंग, सहकार चळवळीचा इतिहास, पान क्रमांक १५.

५२. दातीर आर. के., भारतीय बँक व्यवसाय आणि सहकार, निराली प्रकाशन, पुणे, पान क्रमाकं ८.२, ८.३.

५३. रसाळ राजेंद्र, भारतीय बँक व्यवसाय आणि सहकार, सक्सेस प्रकाशन, पुणे, पान क्रमाकं ८.३.